RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक १७२] सोमवार, डिसेंबर १८, २०१७/अग्रहायण २७, शके १९३९ [पृष्ठे ८८ किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४१४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १६ डिसेंबर २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३.**

क्रमांक कृपमं.०८१७/प्र.क्र.१६४/२१-स (१).—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा २०) याच्या कलम ६० च्या पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) च्या खंड (ड) व (यू) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम, १९६७, यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

(१) या नियमास महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०१७ असे म्हणावे.

(२) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे).

(*एक*) खंड (पाच) आणि (सहा) वगळण्यात येतील ;

(*दोन*) खंड (चौदा), (पंधरा) आणि (सोळा) वगळण्यात येतील ;

(३) मूळ नियमातील नियम ३५, ३५अ, ३५अअ, ३५अ.१अ, ३५ब, ३५बब, ३६ ते ४०, ४०अ, ४१, ४१अ, ४१ब, ४१क, ४१ड, ४१ई, ४१एफ, ४३ ते ५४, ५४अ, ५५ ते ६०, ६०अ, ६०ब, ६०क, ६१, ६१अ, ६१ब, ६२ ते ७१, ७१अ आणि ७२ ते ९० वगळण्यात येतील.

(४) मूळ नियमास जोडलेला नमुना-८अ, नमुना-८ब, नमुना-९, नमुना-१०, नमुना-१०अ, नमुना-१० ब, नमुना-१०क, नमुना-११, नमुना-११अ, नमुना-११ब, नमुना-११क, नमुना-१२, नमुना-१३, नमुना-१४ आणि नमुना-१५ वगळण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Mantralaya Annex, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the16th December 2017.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.

No. KPM-0817/C.R.164/21-C(1).—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses (*d*) and (*u*) of sub-section (*2*) of section 60 of the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963 (Mah. XX of 1964) and of all other powers enabling it in that behalf the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Rules, 1967, the same having been previously published as required by sub-section (*3*) of section 60 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) (Amendment) Rules, 2017.

2. In rule 2 of the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) (Amendment) Rules, 1967 (hereinafter referred to as "the principal Rules"),-

(*i*) clauses (v) and (vi) shall be deleted;

(*ii*) Clauses (xiv), (xv) and (xvi) shall be deleted.

3. Rules, 35, 35A, 35AA, 35A1A, 35B, 35BB, 36 to 40, 40A, 41, 41A, 41B, 41C, 41D, 41E, 41F, 43 to 54, 54A, 55 to 60, 60A, 60B, 60C, 61, 61A, 61B, 62 to 71, 71A and 72 to 90 of the principal Rules shall be deleted.

4. FORM 8-A, FORM 8-B, FORM 9, FORM 10, FORM 10-A, FORM 10-B, FORM 10-C, FORM 11, FORM 11-A, FORM 11-B, FORM 11-C, FORM 12, FORM 13, FORM 14 and FORM 15 appended to the principal Rules shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

BIJAY KUMAR,
Principal Secretary to Government.

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ डिसेंबर २०१७

### अधिसूचना

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३.**

क्रमांक कृपमं. ०८१७/प्र.क्र.१६४/२१-स (२).—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा २०) याच्या कलम ६० च्या पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) च्या खंड (ड) व (यू) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम, १९६७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

**१.** या नियमांना, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम, २०१७ असे म्हणावे.

**२. व्याख्या**.—या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) 'अधिनियम' याचा अर्थ, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा महा. २०), असा आहे.

(२) 'मतपेटी' यात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्य केले असेल त्याप्रमाणे अशा संकल्पनेत बनवलेले मतदारांनी मतपत्रिका टाकण्यासाठी वापरलेली कोणतीही पेटी, पिशवी किंवा इतर वस्तू किंवा, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, यांचा समावेश होतो ;

(३) 'उपविधी' याचा अर्थ, अधिनियमान्वये तयार केलेले उपविधि, असा आहे ;

(४) 'समिती' याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २ च्या पोट-कलम (फ) (आय) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे समिती असा आहे ;

(५) 'मतदारसंघ' याचा अर्थ, या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे निर्वाचक विभाग, असा आहे ;

(६) 'मतमोजणी प्रतिनिधी' याचा अर्थ, उमेदवाराने, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाद्वारे नियुक्त केलेल्या निवडणूक निर्णय अधिका-याच्या पूर्वपरवानगीने आपला मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमलेली व्यक्ती, असा आहे ;

(७) 'निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्याचा दिनांक' याचा अर्थ, प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्याचा दिनांक, असा आहे ;

(८) 'जिल्हा निवडणूक अधिकारी' याचा अर्थ, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली, जिल्ह्यातील किंवा प्रदेशातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला त्यांची कार्ये पार पाडताना सहाय्य करण्याकरिता जिल्हाधिकारी किंवा, यथास्थिती, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था याच्या दर्जा पेक्षा कमी दर्जा नसेल असा, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिलेला किंवा मान्यता दिलेले अधिकारी, असा आहे ;

(९) 'निवडणूक' याचा अर्थ, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या, समितीस किंवा समितीच्या सदस्यांना आणि पदाधिका-यांना निवडून देण्यासाठी घेतलेली निवडणूक, असा आहे ;

(१०) 'निवडणूक प्रतिनिधी' याचा अर्थ, ज्या व्यक्तीचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट आहे व ज्या व्यक्तीस उमेदवाराने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाद्वारे नियुक्त केलेल्या निवडणूक निर्णय अधिका-याच्या पूर्वपरवानगीने आपला निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमले आहे अशी व्यक्ती, असा आहे ;

(११) 'सूचना फलक' याचा अर्थ, असा फलक जो बाजार समिती, निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात किंवा कार्यालयानजीक सूचना लावण्याच्या प्रयोजनासाठी ठेवलेला फलक, असा आहे ;

(१२) 'मतदान प्रतिनिधी' याचा अर्थ, ज्या व्यक्तीचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट आहे व ज्या व्यक्तीस उमेदवाराने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाद्वारे नियुक्त केलेल्या निवडणूक निर्णय अधिका-याच्या पूर्वपरवानगीने आपला मतदान प्रतिनिधी म्हणून नेमले आहे अशी व्यक्ती, असा आहे ;

(१३) 'मतदान अधिकारी' याचा अर्थ, मतदान केंद्राध्याक्षाला सहाय्य करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिका-याने नेमलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(१४) 'मतदान केंद्राध्यक्ष' याचा अर्थ, निवडणूक घेण्याकरिता निवडणूक निर्णय अधिका-याने नेमलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(१५) ‘सार्वजनिक सुट्टी याचा अर्थ, परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा २६) याच्या कलम २५ च्या प्रयोजनाकरिता ज्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असेल असा कोणताही दिवस, असा आहे आणि त्यामध्ये राज्यातील सरकारी कार्यालयांसाठी सुट्टी म्हणून राज्य शासनाने किंवा त्या जिल्ह्यासाठी स्थानिक सुट्टी म्हणून जिल्हाधिका-याने अधिसूचित केलेल्या इतर कोणत्याही दिवसाचा समावेश होतो ;

(१६) ‘राखीव जागा’ याचा अर्थ, महिला, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागास प्रवर्ग यांतील व्यक्तींसाठी राखून ठेवलेली जागा, असा आहे ;

(१७) ‘निवडणूक निर्णय अधिकारी’ याचा अर्थ, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने या नियमाच्या प्रकरण चार खालील कोणतीही निवडणूक पार पाडण्यासाठी नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी असा आहे आणि त्यामध्ये सहायक निवडणूक अधिका-याचा समावेश होतो ;

(१८) ‘राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण’ याचा अर्थ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) याच्या कलम ७३ कब अन्वये राज्य शासनाने घटित केलेले राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, असा आहे ;

(१९) ‘कलम’ याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे ;

(२०) ‘सचिव’ याचा अर्थ, कलम २ च्या खंड (आर) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सचिव, असा आहे ;

(२१) ‘मतदार’ याचा अर्थ, (एक) जो शेतकरी प्रारूप मतदार यादीचा कार्यक्रम प्रसिद्ध करण्याचा दिनांकाला बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात राहत आहे, ज्याने किमान १० आर इतकी जमीन धारण केली आहे, ज्याचे वय १८ वर्षाहून कमी नाही आणि ज्यांनी त्याच्या/ तिच्या अधिसूचित शेतमालाची विक्री मागील पाच वर्षात किमान तीन वेळा केलेली आहे असा शेतकरी ; (दोन) परवानाधारक व्यापारी/ अडत्या, (तीन) परवानाधारक हमाल आणि मापाडी, असा आहे ;

(२२) ‘मतदार यादी’ याचा अर्थ, नियम ६ आणि ७ नुसार अंतिम केल्याप्रमाणे मतदाराची यादी, असा आहे ;

(२३) या नियमामध्ये वापर करण्यात आलेले परंतु त्यात व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमामध्ये त्यास अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

**३.** राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे अधिकार (रा.स.नि.प्रा.).—राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास, कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक पार पाडण्यासाठी खालील अधिकार असतील :—

(एक) निवडणुका घेण्याच्या प्रयोजनार्थ असलेल्या राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही कृषि उत्पन्न बाजार समितीच्या किंवा कोणत्याही स्थानिक संस्थेच्या कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची कोणत्याही पदावर तशा पदनामांसह व कर्तव्यांसह नेमणूक करणे ; आणि अशा प्रकारे नेमणूक केलेल्या प्रत्येक अधिका-याने किंवा कर्मचा-याने त्याला नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडणे त्याच्यावर बंधनकारक असेल. ही कर्तव्ये पार पाडण्यात कसूर केल्यास, तो, भारतीय दंड संहिता, १८६० च्या प्रकरण १० च्या अर्थांतर्गत लोकसेवकाच्या कायदेशीर प्राधिकाराचा अवमान केल्याबद्दल खटला दाखल केला जाण्यासाठी पात्र असेल :

परंतु, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, राज्य शासनाच्या जिल्हाधिकारी किंवा जिल्हा उप निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-यास किंवा कर्मचा-यास, या खंडान्वये त्याचे अधिकार वापरण्याचे निदेश देता येतील :

परंतु आणखी असे की, असा अधिकारी किंवा कर्मचारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सर्वसाधारण देखरेखीखाली व नियंत्रणाखाली काम करील.

(दोन) निवडणूक घेण्यासाठी त्यास आवश्यक वाटत असेल अशी कोणतीही शासकीय किंवा खाजगी जागा, वाहने, सेवा किंवा इतर कोणतीही साधनसामग्री यांची राज्य शासनाचे कोणतेही कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्याकडून मागणी करणे. अशी मागणी केल्यावर, ज्यांच्याकडे अशी मागणी केली असेल त्या प्राधिका-याने जागा, वाहने किंवा, यथास्थिती, इतर कोणतीही साधनसामग्री यांचा ताबा, मागणी करणा-या प्राधिकरणाकडे किंवा याबाबतीत प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे तात्काळ सुपूर्द करणे बंधनकारक असेल :

परंतु राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे राज्य शासनाच्या जिल्हा उप निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-यास किंवा कर्मचा-यास, या खंडान्वये त्याचे अधिकार वापरण्याचे निदेश देता येतील.

(तीन) निवडणूक सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी त्यावर लक्ष ठेवण्याच्या दृष्टीने, नेमणूक करण्यात येतील असे निरीक्षक व क्षेत्रीय अधिकारी यांची जसजशी आवश्यकता असेल तेव्हा व त्याप्रमाणे, नेमणूक करणे ;

(चार) निवडणूक सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी, अधिनियमांच्या व नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश किंवा निदेश देणे ;

(पाच) कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी 'निवडणूक निधीत' आगाऊ जमा करावयाची आवश्यक असलेली निवडणूक खर्चाची रक्कम कलम १४ च्या पोट-कलम (१) अन्वये जमा करण्याबाबत सर्वसाधारण अथवा विशेष आदेश देणे.

**४. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची, कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक घेण्याची जबाबदारी :—**

(१) अधिनियमाच्या व या नियमातील तरतुदींनुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका या राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेतल्या जातील किंवा घेण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(२) प्रत्येक वर्षी निवडणुकीस पात्र असणा-या बाजार समित्यांची यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण आणि जिल्हा निवडणूक अधिकारी नमुना १ मध्ये ठेवतील.

(३) कृषि उत्पन्न बाजार समितीचे सचिव, ज्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूका, अधिनियमाच्या कलम १४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये घ्यावयाच्या आहेत त्या संबंधात, प्रत्येक वर्षी ३०, नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी जिल्हा निवडणूक अधिका-याला ज्या बाजार समितीचा कार्यकाल लगतनंतरच्या वर्षी संपुष्टात येणार आहे त्या समितीच्या संबंधात नमुना २ मध्ये याचा अहवाल सादर करील, व जिल्हा निवडणूक अधिकारी, आपल्या शे-यासह सदर अहवाल दर वर्षी ३१, डिसेंबर रोजी किंवा त्यापूर्वी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास सादर करील.

असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण त्या वर्षी निवडणुकीस पात्र असलेल्या बाजार समित्यांची यादी प्रसिद्ध करील.

## भाग दोन

## मतदारसंघ व मतदार यादी तयार करणे

**५. बाजार कार्यक्षेत्राचे शेतकरी मतदारसंघात भागाप्रमाणे (गणाप्रमाणे) विभाजन करणे :—**

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्याच्या तारखेला शेतकरी मतदारसंघासाठी प्रत्येक बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील विद्यमान यादीतील मतदारांचे शक्य होईल तेवढे १५ समान भागात (गण) विभाजन करण्यात येईल आणि प्रत्येक विभागातून (गण) एक जागा निवडण्यात येईलः

परंतु, प्रारूप यादीचा कार्यक्रम प्रसिद्ध करण्यापूर्वी एक महिना अगोदर जिल्हा निवडणूक अधिकारी बाजार कार्यक्षेत्राचे भाग (गण) घोषित करील आणि शेतकरी मतदारसंघातून राखीव जागा लॉटरी पद्धतीने घोषित करील.

**६. मतदार यादी तयार करणे :—**

(१) जिल्हाधिकारी, जी व्यक्ती किमान १० आर इतकी शेतजमीन धारण करीत आहे व ती बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील आहे अशा शेतकरी मतदारसंघाची गावनिहाय यादी संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवाला व जिल्हा निवडणूक अधिका-याला बाजार समितीचा कार्यकाल संपण्याअगोदर किमान १८० दिवस आधी प्राथमिक मतदार यादी तयार करण्यासाठी देईल किंवा देण्याची व्यवस्था करील.

(२) जिल्हाधिका-याकडून यादी प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीचे सचिव नमुना-४ मध्ये प्रारूप मतदार यादी तयार करील. अशा प्रारूप मतदार यादीमध्ये ज्या शेतक-यांनी मागील पाच वर्षांमध्ये किमान तीन वेळा अधिसूचित केलेला शेतमाल संबंधित बाजार समितीमध्ये विक्री केलेला आहे अशा शेतक-यांची नावे समाविष्ट करण्यात येतील. परवानाधारक व्यापारी व अडते यांनी संबंधित बाजार समितीकडे सादर केलेल्या आणि बाजार समितीने नमुना-३ मध्ये ठेवलेल्या नोंदवहीच्या आधारे अशा शेतमालाची विक्री निश्चित करण्यात येईल.

व्यापारी आणि अडत्यांच्या मतदारसंघाच्या बाबतीत, ज्यांनी अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे असे काम करण्यासाठी म्हणून परवाना धारण केला असेल त्या व्यापा-यांची व अडत्यांची नावे प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

हमाल व मापाडी मतदारसंघाच्या बाबतीत, बाजार क्षेत्रात असे काम करणा-या हमालांची व मापाड्यांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात येतील.

शेतकरी मतदारसंघासाठी विभाग (गण) निहाय समाविष्ट करण्यात आलेली शेतक-याची नावे वर्णक्रमानुसार समाविष्ट करण्यात येतीलः

परंतु, ज्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक काही अपरिहार्य कारणामुळे कार्यकाल संपण्यापूर्वी होऊ शकत नसल्यास राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने ठरविलेल्या दिनांकानुसार प्रारूप मतदार यादी तयार करण्यात येईल :

परंतु असे की, ज्या कृषि उत्पन्न बाजार समितीवर अधिनियमाच्या कलम १३ चे पोट-कलम (२) चे दुसरे परंतुक कलम १५अ किंवा कलम ४५ अन्वये प्रशासक अथवा प्रशासकीय मंडळाची नियुक्ती करण्यात आलेली आहे अशा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मतदारांची प्रारूप यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने ठरविलेल्या दिनांकानुसार तयार करण्यात येईल.

(३) बाजार समितीच्या संबंधित सचिवाने नमुना ४ मध्ये प्रमाणित केलेल्या अधिप्रमाणित प्रारूप मतदार याद्यांच्या चार प्रती, बाजार समितीच्या संबंधित सचिवामार्फत समितीचा कार्यकाल समाप्त होण्याच्या दिनांकापूर्वी एकशे पन्नास दिवस अगोदर संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाद्वारे निदेशित करील असा अन्य अधिकारी यांना मुद्रित त्याचप्रमाणे डिजिटल स्वरूपात पाठविण्यात येतील. संबंधित बाजार समितीचा सचिव नमुना-३ मध्ये ठेवलेल्या अभिलेखानुसार प्रारूप मतदार यादी प्रमाणित करील.

जिल्हा निवडणूक अधिकारी प्रारूप याद्या मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत, संस्थेच्या सभासदांकडून दावे व हरकती मागवील. प्रारूप मतदार यादीच्या प्रती, जिल्हा निवडणूक अधिका-याच्या व बाजार समितीच्या सूचना फलकावर लावण्यात येतील.

(४) कोणतीही कृषि उत्पन्न बाजार समिती नियम ६ च्या उप-कलम (३) मध्ये तरतूद केल्यानुसार प्रारूप मतदार यादीच्या प्रती, जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे नियत दिनांकास किंवा त्यापूर्वी पाठविण्यास कसूर करील तर, जिल्हा निवडणूक अधिकारी स्वतः किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीमार्फत, उप नियम (१) अन्वये त्यास प्राप्त झालेल्या शेतक-यांच्या यादीच्या आधारे अशी प्रारूप मतदार यादी तयार करील आणि त्यासाठी आलेला खर्च, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीकडून किंवा इतर जबाबदार व्यक्तींकडून वसूल करण्यात येईल.

(५) जिल्हा निवडणूक अधिकारी, लगतच्या पूर्ववर्ती उपनियम (४) अन्वये कार्यवाही करीत असेल तर, तो संस्थेच्या सदस्यांकडून, दावे व हरकती मागविण्यासाठी, संस्थेकडून अशी यादी मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, त्याच्या सूचना फलकावर व त्या संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सूचना फलकावर प्रारूप मतदार यादी लावावयाची व्यवस्था करील.

(६) कृषि उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी मतदारसंघाच्या प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट करावयाच्या तपशिलात, नमुना-४ मध्ये आडनाव, नाव, वडीलांचे/पतीचे नाव (वर्णक्रमानुसार), वय, लिंग आणि पत्ता इ. अंतर्भूत असेल.

**७. प्रारूप मतदार यादीवरील दावे व हरकती :—**

(१) दावे किंवा हरकती मागविण्यासाठी कोणतीही प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल तेव्हा, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या प्रारूप मतदार यादीत ज्यांचे नाव असेल त्या कोणत्याही सदस्यास, यादीतील नाव किंवा पत्ता किंवा इतर तपशील यांच्यासंबंधातील कोणतीही अकृती किंवा चूक, प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देता येईल.

(२) प्रत्येक दावा किंवा हरकत लेखी स्वरूपात दाखल करण्यात येईल आणि ज्या कारणावरून दावा करण्यात किंवा, यथास्थिती, हरकत घेण्यात आलेली असेल ती कारणे त्यात नमूद करण्यात येतील व त्यासंदर्भातील पुरावा, कोणताही असल्यास सोबत जोडण्यात येईल.

(३) जिल्हा निवडणूक अधिकारी याबाबतीत आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर किंवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या निदेशानुसार, प्रत्येक दावा किंवा हरकत विचारात घेईल आणि दावे किंवा हरकती प्राप्त होण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापासून दहा दिवसांच्या आत संबंधित व्यक्तींना त्यावरील त्याचा निर्णय लेखी देईल. त्यानंतर हरकती व दावे प्राप्त होण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. सर्व दावे व हरकतींवर निर्णय दिल्यानंतर, जिल्हा निवडणूक अधिका-यांकडून अंतिम रूप दिलेली यादी ही अंतिम मतदार यादी असेल.

(४) मतदारांच्या अंतिम यादीच्या प्रती जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सूचना फलकावर, निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी किमान दहा दिवस अगोदर आणि कोणतीही हरकत व दावे निकालात काढल्यापासून पंधरा दिवसानंतरचा कालावधी नसेल अशा कालावधीत नमुना-५ मध्ये प्रसिद्ध करण्यात येतील.

**८. मतदान करण्याचा अधिकार :—**

(१) संबंधित मतदारसंघाच्या अंतिम मतदार यादीमध्ये व ज्या व्यक्तीचे नाव नोंदवलेले आहे त्या प्रत्येक व्यक्तीस त्या मतदारसंघात मतदान करण्याचा अधिकार आहे.

शेतकरी मतदारसंघामध्ये मतदाराचे नाव ज्या विभागात (गण) नोंदविण्यात आलेले आहे फक्त त्याच विभागात (गण) त्याला मतदान करता येईल.

(२) ज्या व्यक्तीला तुरूंगवास वा जन्मठेपेची शिक्षा झालेली आहे किंवा कायदेशीररित्या पोलीस कस्टडी मिळालेली आहे अशा व्यक्तींना मतदान करता येणार नाही.

## भाग तीन

## समितीचा सदस्य होण्यासाठीची पात्रता

९. **निवडून यावयाच्या अर्हताप्राप्त व्यक्ती** :—

(१) जी व्यक्ती शेतकरी आहे आणि जी बाजार क्षेत्रात राहत आहे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास जिचे वय एकवीसपेक्षा कमी नसेल आणि जिला आवश्यकता पडल्यास जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती, जिल्हा उप निबंधक यांनी अधिनियम किंवा नियमान्वये अपात्र ठरविलेले नसेल आणि जिचे नाव अंतिम मतदार यादीमध्ये समाविष्ट असेल अशी प्रत्येक व्यक्ती शेतकरी मतदारसंघाकडून घेण्यात येणा-या निवडणुकीसाठी पात्र असेल.

(२) या नियमान्वये जिचे नाव व्यापारी मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये असेल अशी प्रत्येक व्यक्ती, व्यापारी मतदारसंघातून घेण्यात येणा-या निवडणुकीसाठी पात्र असेल.

(३) जिचे नाव नियम ६ व ७ अन्वये तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये समाविष्ट आहे आणि जिला या नियमान्वये अपात्र ठरविण्यात आलेले नाही अशी प्रत्येक व्यक्ती, बाजार समितीची निवडणूक लढविण्यास पात्र असेल.

(४) या नियमान्वये जिचे नाव हमाल व मापाडी मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट आहे अशी प्रत्येक व्यक्ती, हमाल व मापाडी मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास पात्र असेल.

१०. **समिती सदस्यत्वासाठीच्या अपात्रता** :—

(१) बाजार समितीची सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी किंवा सदस्य असण्यासाठी एखादी व्यक्ती पुढील बाबतीत,

(अ) जिला भारतामधील न्यायालयाने दोषी ठरविण्यात आले असेल आणि त्या अपराधासाठी सहा महिन्यांपेक्षा जास्त मुदतीची शिक्षा न्यायालयाने दिली असेल व राज्य शासनाने दिलेल्या आदेशाद्वारे अशी अपात्रता काढून टाकण्यात आली नसेल तर; किंवा

(ब) तिची वयाची २१ वर्षे पूर्ण झाली नसेल ; किंवा

(क) ती विकल मनाची असेल तिला सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले असेल ; किंवा

(ड) ती अमुक्त नादार असेल ; किंवा

(इ) ती बहिरी आणि मुकी असेल तर ; किंवा

(फ) बाजार समितीस देणे असलेल्या कोणत्याही फी किंवा आकाराची रक्कम देण्यात तिने कसूर केली असेल.

(ग) ती बाजार समितीची किंवा शासनाची असेल किंवा स्थानिक प्राधिकरणाची कर्मचारी असेल किंवा बाजार समितीची व्यापारी, अडत्या, हमाली किंवा तोलारी या व्यतिरिक्त इतर कोणतीही अनुज्ञप्ती धारण करीत असेल तर ; किंवा

(ह) जर तिचे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे किंवा तिच्या भागीदाराद्वारे कोणत्याही संविधेत किंवा रोजगारात किंवा बाजार समितीच्या वतीने किंवा बाजार समितीच्या अधीन कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर ; किंवा

(आय) जर तिने अधिनियम किंवा नियम किंवा त्याखाली केलेले उपविधी यांचा एकाहून अधिक वेळा भंग केला असेल तर ; किंवा

(जे) तिने अधिनियम किंवा नियमाद्वारे आवश्यक केल्याप्रमाणे कोणत्याही विक्रेत्याला किंवा अडत्याला रकमा प्रदान करण्यात कसूर केली असेल तर, किंवा

(के) तिला अधिनियम किंवा त्याखाली केलेल्या नियम याद्वारे अपात्र ठरविण्यात आले असेल तर ;

ती अपात्र ठरेल.

(२) (एक) एखादी व्यक्ती सर्वसाधारणपणे बाजार क्षेत्रामध्ये राहात नसेल किंवा बाजार समितीने तिला दिलेली अनुज्ञप्ती रद्द करण्यात किंवा ती तहकूब करण्यात आली असेल किंवा तिचे नवीकरण करण्यात आले नसेल तर, व्यापा-यांच्या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारी म्हणून त्या व्यक्तीची निवड करता कामा नये ;

(दोन) एखाद्या व्यक्तीची मुख्य प्राप्ती शेतीपासून नसेल किंवा त्याच्याजवळ व्यापा-याची अनुज्ञप्ती असेल किंवा ज्या कुटुंबाजवळ किंवा पेढीजवळ व्यापा-याची किंवा अडत्याची अनुज्ञप्ती आहे अशा एकत्र कुटुंबात किंवा पेढीमध्ये त्याचा हितसंबंध असेल तर, त्या व्यक्तीची शेतक-यासाठी असलेल्या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारा सदस्य म्हणून निवड करता कामा नये.

**स्पष्टीकरण.**—या उप-नियमाच्या प्रयोजनासाठी एखादी व्यक्ती, कॅलेंडर वर्षातील १८० दिवसांपेक्षा कमी नसेल इतके दिवस बाजार क्षेत्रात राहात असेल तर तो अशा क्षेत्रात सर्वसाधारण रहात असल्याचे समजण्यात येईल.

(३) जेव्हा उप-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या अपात्रतेसंबंधी, कोणतेही प्रश्न उपस्थित होतात त्यावेळी ते प्रश्न निर्णयासाठी संचालकांकडे पाठविण्यात येतील. अशा रीतीने संदर्भित प्रत्येक प्रश्नाचा निर्णय ३० दिवसांच्या आत संचालकाने दिला पाहिजे. संचालकाच्या निर्णयानुसार किंवा यथास्थिती, अपिलातील निर्णयानुसार ती व्यक्ती अपात्र ठरली असेल तर तिला ती संचालकाने किंवा, यथास्थिति अपील प्राधिका-याने ज्या दिनांकास निर्णय दिला असेल त्या दिनांकापासून पद धारण करण्याचे बंद करील. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, या संबंधीचा निर्णय मिळाल्यानंतर समितीचा कार्यकाल १ वर्षाहून अधिक असेल तर उर्वरित कालावधीसाठी तरतूद केल्याप्रमाणे पोट निवडणूक घेईल.

(४) सदस्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज कोणत्याही अशा प्रश्नावर कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही.

(५) संचालकाच्या निर्णयाने व्यथित झालेल्या सदस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, ज्या दिनांकाला सदर निर्णय कळविण्यात आला असेल त्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत राज्य शासनाकडे अपील करता येईल.

## भाग चार

## निवडणूका घेण्यासाठीची प्रशासकीय यंत्रणा

११. **निवडणूका घेण्यासाठी आवश्यक असलेले निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व असे इतर अधिकारी यांची नेमणूक** :—

(१) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, निवडणूक निर्णय अधिका-याची नियुक्ती करील आणि त्याला मदत करण्यासाठी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संबोधल्या जाणा-या एका किंवा अधिक व्यक्तींची देखील नियुक्ती करता येईल.

(२) प्रत्येक सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निर्णय अधिका-याचे नियंत्रण आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सर्वसाधारण नियंत्रण यांच्या अधीन राहून निवडणूक निर्णय अधिका-याची सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडण्यास सक्षम असेल :

परंतु, कोणताही सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, नामनिर्देशन पत्राच्या छाननीशी संबंधित असतील अशी, निवडणूक निर्णय अधिका-याची कोणतीही कार्ये पार पाडणार नाही मात्र, उक्त कार्ये पार पाडण्यापासून निवडणूक निर्णय अधिका-याला अपरिहार्यपणे प्रतिबंधित केलेले नसेल तर ती बाब अलाहिदा

परंतु, आणखी असे की, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास, जर निवडणूक निर्णय अधिकारी आपली कार्ये पार पाडण्यास असमर्थ असेल तर, अशा निवडणूक निर्णय अधिका-याला बदलता येईल.

१२. **निरीक्षकाची नेमणूक**.—राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास, कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने निरीक्षकावर सोपविलेली इतर कार्ये पार पाडण्यासाठी, शासकीय अधिका-याला निरीक्षक म्हणून नामनिर्देशित करता येईल.

१३. **निवडणूक निर्णय अधिका-याचे सर्वसाधारण कर्तव्य**.—कोणत्याही निवडणुकीत, हे नियम व याबाबत त्याखाली काढलेले आदेश यांमध्ये तरतूद केलेल्या रीतीने, कार्यक्षमपणे निवडणूक घेण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व कृती आणि गोष्टी करणे हे निवडणूक निर्णय अधिका-याचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

१४. **मतदान केंद्रे**.—निवडणूक निर्णय अधिकारी, आवश्यकता असेल तर, ज्या मतदारसंघाची निवडणूक घ्यावयाची असेल अशा कोणत्याही मतदारसंघासाठी पुरेशा प्रमाणात मतदान केंद्रांची तरतूद करील व बाजार समितीच्या सूचना फलकावर आणि त्याला योग्य वाटेल अशा अन्य रीतीने अशाप्रकारे तरतूद केलेली मतदान केंद्रे आणि ज्यासाठी त्या मतदान केंद्रांची अनुक्रमे तरतूद करण्यात आली असेल ती मतदान क्षेत्रे दर्शविणारी यादी प्रसिद्ध करील.

१५. **मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांची नेमणूक** :—

(१) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक मतदान केंद्रासाठी, मतदान केंद्राध्यक्ष आणि त्याला आवश्यक वाटेल अशा मतदान अधिका-याची किंवा अधिका-यांची नेमणूक करील, परंतु, जी व्यक्ती संबंधित बाजार समितीकडून किंवा तिच्या वतीने कामावर लावलेली असेल किंवा त्या निवडणुकीत किंवा निवडणुकीसंबंधी उमेदवारासाठी अन्यथा काम करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करणार नाहीः

परंतु, मतदान केंद्रावर मतदान अधिकारी गैरहजर असेल तर, मतदान केंद्राध्यक्षास, जी व्यक्ती संबंधित बाजार समितीकडून किंवा तिच्या वतीने कामावर लावलेली असेल किंवा निवडणुकीत किंवा निवडणुकीसंबंधी, त्या उमेदवारासाठी अन्यथा काम करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीव्यतिरिक्त, मतदान केंद्रावर उपस्थित असणा-या कोणत्याही व्यक्तीची, अशा अधिका-याच्या अनुपस्थितीत मतदान अधिकारी म्हणून नेमणूक करता येईल आणि निवडणूक निर्णय अधिका-यास त्याप्रमाणे कळविता येईल.

(२) मतदान केंद्राध्यक्षाने तसा निर्देश दिला असेल तर, मतदान अधिकारी, अधिनियमाखालील किंवा तद्न्वये केलेले कोणतेही नियम यांखालील मतदान केंद्राध्यक्षाची सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडील.

(३) आजारपणामुळे किंवा अन्यथा अथवा इतर अपरिहार्य कारणामुळे मतदान केंद्राध्यक्षास, मतदान केंद्रावर उपस्थित राहणे शक्य झाले नसेल तर, त्याच्या अनुपस्थितीमध्ये अशी कार्ये पार पाडण्यासाठी, मतदान केंद्राध्यक्षाकडून त्यापूर्वी ज्यास प्राधिकृत करण्यात आले असेल अशा मतदान अधिका-याकडून त्याची कार्ये पार पाडण्यात येतील.

१६. **मतदान केंद्राध्यक्षाचे आणि मतदान अधिका-यांचे सर्वसाधारण कर्तव्य** :—

(१) मतदान केंद्रावर कायदा व सुव्यवस्था राखणे आणि मतदान योग्यप्रकारे होत आहे हे पाहणे, हे मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

(२) मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षाला त्याची कामे पार पाडण्यात मदत करणे हे, त्या मतदान केंद्रावरील मतदान अधिका-याचे कर्तव्य असेल.

१७. **नियंत्रण** :—

या नियमांशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात नियुक्त करण्यात आलेले निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि अन्य व्यक्ती हे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सर्वसाधारण मार्गदर्शन, पर्यवेक्षण व नियंत्रणाखाली काम करतील.

## भाग पाच

## निवडणुका घेणे

१८. **निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे** :—

(१) निवडणूक निर्णय अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेने, निवडणुकीच्या विविध टप्प्यांचा कार्यक्रम आखून संस्थेची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत तो जाहीर करील. हा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असेल :—

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| एक | निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचा दिनांक | निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याच्या वेळेस घोषित करावयाचा निवडणुकीचा दिनांक. |
| दोन | नामनिर्देशन करण्याचा शेवटचा दिनांक | निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ५ दिवस |
| तीन | मिळालेल्या नामनिर्देशनपत्रांच्या यादीच्या प्रसिद्धीचा दिनांक. | नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत जसजशी मिळतील त्याप्रमाणे. |
| चार | नामनिर्देशनपत्रांच्या छाननीचा दिनांक | नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या दिनांकानंतरचा |
| पाच | छाननीनंतर वैध नामनिर्देशनपत्रांच्या यादीच्या प्रसिद्धीचा दिनांक. | छाननी पूर्ण झाल्यानंतरच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी |
| सहा | ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक. | छाननीनंतर वैध नामनिर्देशपत्रांच्या यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत. |
| सात | निवडणूक लढविणा-या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्याचा व निशाण्याचे वाटप करण्याचा दिनांक. | उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकाच्या लगतनंतरचा दिवस. |
| आठ | ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदान घेण्यात येईल तो दिनांक, ती वेळ व ते ठिकाण/ठिकाणे, आवश्यक असल्यास. | निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या अंतिम यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवस अगोदरचा नसेल व १५ दिवसांनंतरचा नसेल असा दिनांक (निवडणूक निर्णय अधिकारी, वेळ व ठिकाण निश्चित करील). |
| नऊ | मतमोजणीचा दिनांक, वेळ व ठिकाण | ज्या दिनांकास मतदान घेण्यात येईल त्या दिनांकापासून तिस-या दिवसाच्या आत (निवडणूक निर्णय अधिकारी वेळ व ठिकाण निश्चित करील). |
| दहा | मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक | मतमोजणीनंतर लगेच. |

**स्पष्टीकरण :—**

(अ) वरील प्रकरणांत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे गणना करतानाचा दिनांक हा जर सार्वजनिक सुट्टीचा दिवस असेल तर, तिचा निकट अनुवर्ती कामाचा दिवस, त्यात्या कारणांसाठी निश्चित करण्यात येईल.

(ब) प्रत्येक मतदान केंद्रामधील मतदारांच्या संख्येनुसार मतदान केंद्रांची संख्या व त्यांची ठिकाणे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिका-याशी विचारविनिमय करून निश्चित करण्यात येतील. जेथे संपूर्ण बाजार क्षेत्रात मतदान केंद्रे विखुरली असतील त्या बाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी, त्याच्या कार्यालयात किंवा त्यास योग्य वाटेल अशा सुरक्षित ठिकाणी सर्व मतपेट्या किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे मिळण्याची व्यवस्था करील.

१९. **निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याची रीत** :—

(एक) निवडणूक निर्णय अधिकारी नियम १८ अन्वये नमुना ६ मध्ये काढलेल्या आदेशाची प्रत, एकतर बाजार समितीस जातीने देईल किंवा बाजार समितीच्या नोंदणी केलेल्या पत्त्यावर, नोंदणीकृत डाकेने किंवा विशेष दूतामार्फत पाठवील आणि बाजार समितीच्या सूचना फलकावर लावण्याचे किंवा बाजार समितीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे निदेश देईल. त्याशिवाय उक्त निवडणूक कार्यक्रम, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या तर्फे त्यांच्या सूचना फलकावर लावण्यात येईल किंवा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(दोन) प्रत्यक्ष मतदानाची वेळ निवडणूक कार्यक्रमामध्ये नमूद करण्यात यावी.

(तीन) निवडणूक निर्णय अधिकारी निवडणुकीच्या वेगवेगळ्या टप्प्यांकरिता जेथे जेथे आवश्यक असेल तेथे तेथे वेळ, तारीख आणि ठिकाण निश्चित करील व त्याने जाहीर करावयाच्या निवडणूक कार्यक्रमांमध्ये नमूद करण्यात येईल.

(चार) निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीचा कार्यक्रम किमान एका स्थानिक वृत्तपत्रात देखील प्रसिद्ध करील;

(पाच) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेशिवाय, या नियमान्वये निश्चित केलेले दिनांक मतदानासाठी निश्चित केलेल्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत बदलता येणार नाहीत.

२०. **उमेदवारांचे नामनिर्देशन** :—

(१) अधिनियम, नियम आणि संबंधित बाजार समितीचे उप विधि यांच्या तरतुदींअन्वये एखादी जागा भरण्यासाठी एखादा सदस्य निवडला जाण्यास अर्हताप्राप्त असेल आणि त्याचे नाव अंतिम मतदार यादीत नमूद केलेले असेल तर, ती जागा भरण्यासाठी निवडणुकीतील उमेदवार म्हणून, अशा कोणत्याही सदस्यास नामनिर्देशित करता येईल :

(२) नियम २१ अन्वये सादर केलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र, नमुना ७ मध्ये पूर्णपणे भरण्यात येईल :

परंतु, नामनिर्देशनपत्रातील निशाणी संबंधातील प्रतिज्ञापत्र भरण्यातील कसूर, किंवा ते पूर्ण करण्यातील दोष हा या नियमांच्या अर्थांतर्गत, महत्त्वाचा दोष असल्याचे मानण्यात येणार नाही.

(३) अंतिम मतदार यादीमध्ये जिचे नाव नोंदविण्यात आलेले आहे अशा कोणत्याही व्यक्तीला निवडणुकीसाठी एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशन करण्यासाठी सूचक किंवा अनुमोदक होता येईल :

(४) निवडणूक निर्णय अधिकारी अथवा त्यांनी त्यासाठी प्राधिकृत केलेला अधिकारी नमुना-७ मधील नामनिर्देशनपत्र कोणत्याही मतदारास किंवा बाजार क्षेत्रात राहणा-या शेतक-यास, त्याने मागणी केल्यावर, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने निश्चित केलेले शुल्क भरल्यानंतर पुरविण्यात येईल.

२१. **नामनिर्देशनपत्र सादर करणे आणि वैध नामनिर्देशनपत्रासाठी आवश्यक असलेल्या बाबी** :—

(१) नियम १८ अन्वये नियत केलेल्या, नामनिर्देशन करण्यासाठीच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वी, प्रत्येक उमेदवार, उक्त नियमांन्वये घोषित केलेल्या कार्यक्रमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळी आणि ठिकाणी, नियम २० द्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्ण भरलेले आणि उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी केलेले आणि त्याच्या मतदारसंघातील दोन मतदारांनी, ज्यापैकी एक सूचक व अन्य अनुमोदक असेल, त्यांची स्वाक्षरी केलेले नामनिर्देशनपत्र, एकतर व्यक्तीशः किंवा त्याचे नाव सुचविणा-या व्यक्तीमार्फत निवडणूक निर्णय अधिका-याच्या स्वाधीन करील.

(२) या नियमांन्वये मतदार म्हणून कोणत्याही अपात्रतेच्या अधीन नसलेल्या आणि ज्यासाठी उमेदवार नामनिर्देशित केले असतील त्या मतदारसंघासाठीच्या मतदार यादीत ज्याच्या नावाची नोंद केलेली असेल त्या कोणत्याही व्यक्तीस सूचक किंवा अनुमोदक म्हणून स्वाक्षरी करता येईल. सदर व्यक्ती एकाहून अधिक नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करणार नाही.

(३) राखीव मतदारसंघाकरिता कलम १३ (१) च्या तरतुदींन्वये सादर केलेल्या नामनिर्देशनपत्रांच्या बाबतीत, उमेदवाराने नामनिर्देशन पत्रामध्ये तो अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यापैकी कोणत्या वर्गात मोडत आहे याचा तपशील नमूद केला पाहिजे. तसेच नामनिर्देशन पत्रासोबत स्वतः प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र तसेच सक्षम प्राधिका-याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र जोडलेले असले पाहिजे.

(४) नामनिर्देशनपत्र दाखल केल्यानंतर निवडणूक निर्णय अधिका-याने उमेदवार हा शेतकरी असल्याचे तसेच बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात राहत असल्याबाबत खात्री केली पाहिजे. त्याचप्रमाणे व्यापारी अन्य मतदारसंघातील सूचक, अनुमोदकांची नावे, त्यांचे मतदार यादीतील क्रमांक याबाबत खात्री केली पाहिजे :

परंतु, निवडणूक निर्णय अधिकारी उक्त नावांच्या अथवा बाजार समितीच्या बाबतीत नामनिर्देशन पत्रामधील कोणताही लेखन वा तांत्रिक दोष दूर करण्याची परवानगी देईल, जेणेकरून मतदार यादीतील त्यांच्या संबंधित नोंदीशी त्या अनुरूप होतील आणि जेथे आवश्यक असेल तेथे उक्त नोंदीमधील कोणताही लेखन वा तांत्रिक दोष दुर्लक्षित करील.

(स्पष्टीकरण :—निवडणूक निर्णय अधिका-यांची खात्री होण्यासाठी उमेदवाराने अधिनियमाच्या कलम २ (१)(ख) नुसार तो हा शेतकरी व बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील रहिवाशी असल्याबाबत संबंधित गावच्या तलाठ्याने दिलेला दाखला नामनिर्देशनपत्रासोबत जोडला पाहिजे. संबंधित तलाठ्याने दिलेला दाखला हा तो उमेदवार हा शेतकरी व कार्यक्षेत्रातील रहिवाशी असल्याबाबतचा पुरावा म्हणून ग्राह्य धरला पाहिजे.)

(५) एका उमेदवाराला एकाच मतदारसंघातून एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल करता येतील :

परंतु, एका उमेदवाराला किंवा त्याच्या वतीने एका मतदारसंघातून चारपेक्षा जास्त नामनिर्देशनपत्रे दाखल करता येणार नाहीत. तसेच निवडणूक निर्णय अधिका-यालाही ती स्वीकारता येणार नाहीत.

२२. **निवडणुकीसाठी निशाण्या** :—

(१) निवडणूक निर्णय अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या निशाण्यांमधून उमेदवारास निवडणुकीच्या वेळी निवडता येतील अशा निशाण्या विनिर्दिष्ट करील, परंतु, मान्यताप्राप्त राजकीय पक्षाशी संबंधित असतील अशा कोणत्याही निशाण्या तो नेमून देणार नाही.

(२) जेव्हा अशा कोणत्याही निवडणुकीच्या वेळी उमेदवाराकडून किंवा त्याच्यावतीने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्र देण्यात येतील त्याबाबतीत, प्रथम देण्यात आलेल्या नामनिर्देशन पत्रात निशाण्यांच्या संबंधात करण्यात आलेली प्रतिज्ञापत्रे, जरी उक्त नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले असले तरी, नियम २९ च्या उप नियम ३ अन्वये विचारात घेण्यात येतील व निशाण्यांच्या संबंधातील इतर कोणतीही प्रतिज्ञापत्रे विचारात घेण्यात येणार नाहीत.

२३. **अनामत रक्कम आणि शुल्क** :—

(१) उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिका-याकडे खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे रक्कम जमा केल्याखेरीज, किंवा जमा करण्याची व्यवस्था केल्याखेरीज, एखाद्या मतदारसंघातून त्याला निवडणुकीसाठी यथोचितरीत्या नामनिर्देशित करण्यात आले असल्याचे समजण्यात येणार नाही :

| राखीव जागेशिवाय अन्य उमेदवारासाठी अनामत रक्कम | राखीव उमेदवारासाठी अनामत रक्कम | नामनिर्देशन शुल्क |
|---|---|---|
| रु. ५००० | रु. १००० | रु. २०० |

परंतु, उमेदवाराने एकाच मतदारसंघातील निवडणुकीसाठी एकाहून अधिक नामनिर्देशनपत्रे दाखल केली असतील त्याबाबतीत, या नियमान्वये त्याने एकाहून अधिक अनामत रक्कम जमा करणे आवश्यक असणार नाही :

परंतु, आणखी असे की, उमेदवाराने त्याचे नामनिर्देशन मागे घेतल्यास, अनामत रक्कम त्याने नामनिर्देशन मागे घेतल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत परत करण्यात येईल.

२४. **नामनिर्देशनाची नोटीस आणि छाननीची वेळ व जागा**.—

निवडणूक निर्णय अधिकारी, नियम २१ अन्वये नामनिर्देशनपत्र मिळाल्यानंतर, ते देणा-या व्यक्तीस किंवा व्यक्तींना, नामनिर्देशनाच्या छाननीसाठी निश्चित केलेला दिवस, वेळ, आणि जागा यांबाबत कळवील, आणि त्या नामनिर्देशनपत्रावर अनुक्रमांक नोंदवून त्याची पोच पावती देईल आणि त्यावर ज्या तारखेस आणि ज्यावेळेस ते नामनिर्देशन त्याच्याकडे पाठविण्यात आले असेल ती तारीख व वेळ नमूद असलेला दाखला स्वाक्षरीत करील, आणि त्यानंतर शक्य तितक्या लवकर उमेदवार आणि सूचक दोघांच्या नामनिर्देशन पत्रात अंतर्भूत असणा-या वर्णनासारखे वर्णन असणा-या नामनिर्देशनाची नोटीस आपल्या कार्यालयात ठळक जागी लावण्याची व्यवस्था करील.

२५. **नामनिर्देशनपत्रांची छाननी**.—

(१) नियम २० अन्वये नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी तारीख निश्चित केल्यानंतर, उमेदवार आणि प्रत्येक उमेदवाराने यथोचितरीत्या लेखी प्राधिकृत केलेला एक सूचक यांना, याबाबत नियत केलेल्या वेळी आणि जागी उपस्थित राहता येईल, आणि निवडणूक निर्णय अधिकारी, नियम २१ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पाठविण्यात आलेल्या, अशा सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांच्या तपासणीसाठी सर्व वाजवी सोयी त्यांना उपलब्ध करून देईल अथवा त्या देण्याची व्यवस्था करील. नामनिर्देशनपत्रांच्या छाननीस इतर कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहता येणार नाही.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी, त्यानंतर त्या नामनिर्देशनपत्रांची तपासणी करील आणि कोणत्याही नामनिर्देशनासंबंधी घेण्यात येतील अशा सर्व आक्षेपांवर निर्णय देईल आणि एकतर असे आक्षेप घेण्यात आल्यावर किंवा स्वतः होऊन, त्यास आवश्यक वाटेल अशी संक्षिप्त चौकशी, कोणतीही असल्यास, ती केल्यानंतर, पुढीलपैकी कोणत्याही कारणासाठी कोणतेही नामनिर्देशनपत्र फेटाळता येईल :—

(अ) अधिनियम व नियम याद्वारे किंवा तद्न्वये जागा भरण्यासाठी निवडून येण्यास उमेदवार अनर्ह असेल तर,

(ब) सूचक किंवा अनुमोदक नामनिर्देशनपत्रावर स्वाक्षरी करण्यास अनर्ह असेल तर,

(क) या नियमांचे नियम १०, २१ व २३ च्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे पालन करण्यात कसूर झाली असेल तर,

(ड) उमेदवाराची किंवा त्याच्या सुचकाची अथवा अनुमोदकाची नामनिर्देशनपत्रावरील सही खरी नसेल तर.

(३) ज्या नामनिर्देशनपत्रासंबंधात कोणतीही नियमबाह्य गोष्ट घडली नसेल अशा दुस-या एखाद्या नामनिर्देशनपत्राद्वारे एखादा उमेदवार यथोचितरीत्या नामनिर्देशित करण्यात आला असेल तर, उप नियम (२) चा खंड (क) किंवा (ड) मधील कोणत्याही मजकुरामुळे, पहिल्या नामनिर्देशनपत्रासंबंधात कोणतीही नियमबाह्यता घडली आहे या कारणावरून, कोणत्याही उमेदवाराचे दुसरे नामनिर्देशनपत्र फेटाळण्याचा अधिकार मिळतो असे समजता येणार नाही.

(४) निवडणूक निर्णय अधिकारी, गंभीर स्वरूपाचा नसेल अशा कोणत्याही दोषावरून कोणतेही नामनिर्देशनपत्र फेटाळणार नाही.

(५) निवडणूक निर्णय अधिकारी, नियम १८ अन्वये याबाबत नियत केलेल्या तारखेस छाननी करील आणि दंगा किंवा उघड हिंसाचार किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणे यामुळे अशा कामकाजामध्ये व्यत्यय किंवा अडथळा आला असेल त्याव्यतिरिक्त, कामकाज स्थगित करण्यास मान्यता देणार नाही :

परंतु, निवडणूक निर्णय अधिका-याने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने कोणताही आक्षेप घेतला असेल त्याबाबत, संबंधित उमेदवारास, त्या आक्षेपाचे खंडन करण्यासाठी, वैध नामनिर्देशनांची यादी प्रसिद्ध होण्याच्या लगतपूर्वीच्या दिवसानंतरची नसेल अशी मुदत देण्यात येईल आणि निवडणूक निर्णय अधिकारी, ज्या तारखेपर्यंत कामकाज स्थगित करण्यात आले असेल त्या तारखेस आपला निर्णय नोंदवील.

(६) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर, ते स्वीकारल्याचा किंवा ते फेटाळण्याचा आपला निर्णय पृष्ठांकित करील आणि नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले असेल तर, फेटाळण्याच्या आपल्या कारणांच्या संक्षिप्त निवेदनाची लेखी नोंद करील, आणि अशा निवेदनाची एक प्रत संबंधित उमेदवार किंवा त्याचा सूचक यांनी मागणी केल्यास देईल. प्रस्तुत निवेदनाची एक प्रत न चुकता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला पाठविण्यात येईल.

२६. **वैध नामनिर्देशनांची यादी प्रसिद्ध करणे** :—

सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आल्यानंतर आणि ते स्वीकारल्याच्या किंवा फेटाळल्याच्या निर्णयाची नोंद करण्यात आल्यानंतर लगेचच, निवडणूक निर्णय अधिकारी, ज्यांची नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात आली असतील त्या उमेदवारांची यादी तयार करील. छाननी संपल्यानंतर लगेच, पुढील दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी आपल्या सूचनाफलकावर ती यादी लावील आणि ती यादी अशारितीने ज्या दिनांकास आणि ज्या वेळेस लावण्यात आली असेल तो दिनांक आणि वेळ यांची नोंद करील :

परंतु, अपील प्राधिका-यापुढे दाखल करण्यात आलेल्या अपिलामध्ये नामनिर्देशनपत्र वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे निवडणूक निर्णय अधिकारी, वैध नामनिर्देशनांच्या यादीत समाविष्ट करण्यास सक्षम असेल.

२७. **अपील** :—

(१) नामनिर्देशन पत्र फेटाळण्याबाबतच्या निवडणूक निर्णय अधिका-याच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही उमेदवारास, ते नामनिर्देशनपत्र फेटाळल्याच्या आदेशाच्या दिनांकापासून तीन दिवसात जिल्हा निवडणूक अधिका-याकडे, आणि ज्यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी हे स्वतः निवडणूक निर्णय अधिकारी असतील त्यावेळी पणन संचालकाकडे अपील दाखल करता येईल. असे अपील प्राप्त झाल्याचा दिनांकापासून दहा दिवसाच्या आत ते निकाली काढतील आणि त्यावरील त्यांचा निर्णय अंतिम असेल.

(२) निवडणूक निर्णय अधिका-यांनी नामनिर्देशनपत्र मंजुरी व नामंजुरीबाबत दिलेल्या निर्णयाविरूद्ध केलेल्या अपिलावरील जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा पणन संचालक यांनी या नियमानुसार दिलेला निर्णय हा अंतिम व निर्णायक असेल.

२८. **उमेदवारी मागे घेणे** :—

(१) कोणत्याही उमेदवारास, निवडणूक निर्णय अधिका-याकडे आपल्या सहीनिशी पाठविलेल्या लेखी नोटिशीद्वारे आपली उमेदवारी पुढीलप्रमाणे मागे घेता येईल :—

(अ) ज्यावेळी नियम २७ नुसार अपील दाखल केलेले नसेल आणि नियम २७ च्या उप नियम (१) मधील तरतुदीनुसार अपिलाची मुदत संपल्यानंतर लगेच.

(ब) ज्या दिवशी जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा यथास्थिती पणन संचालक यांनी अपिलावर दिलेल्या निर्णयाच्या दुस-या दिवसापासून.

(२) उमेदवारी मागे घेण्यासाठी उप नियम (१) अन्वये निश्चित केलेल्या शेवटच्या दिवशी दुपारी ३-०० वाजण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिका-याकडे नोटीस पाठविण्यात येईल.

(३) ती नोटीस, एकतर उमेदवारास स्वतः किंवा त्याच्या सूचकास जातीने लेखी स्वरूपात देता येईल.

(४) उप नियम (१) अन्वये जीला आपली उमेदवारी मागे घेतल्याची नोटीस देण्यात आली असेल अशा व्यक्तीस, ती नोटीस रद्द करण्याची मुभा देण्यात येणार नाही.

(५) निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवारी मागे घेतल्याच्या नोटिशीचा खरेपणा आणि उप नियम (१) अन्वये ती देणा-या व्यक्तीची ओळख यांबाबत खात्री पटल्यावर, त्याच्या कार्यालयातील सूचनाफलकावर ती नोटीस लावण्याची व्यवस्था करील.

२९. **निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी तयार करणे आणि निशाण्यांचे वाटप करणे** :—

(१) उमेदवारी मागे घेण्याकरिता निश्चित करण्यात आलेल्या शेवटच्या तारखेच्या लगतनंतरच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक लढविणा-या उमेदवारांची, म्हणजेच ज्यांची नामनिर्देशनपत्रे अंतिमरीत्या स्वीकारण्यात आली असतील आणि ज्यांनी आपली उमेदवारी विहित मुदतीत मागे घेतली नसेल अशा उमेदवारांची मराठीत यादी तयार करील आणि ती नमुना ८ मध्ये त्याच्या कार्यालयातील सूचनाफलकावर प्रसिद्ध करील.

(२) उक्त यादीत, नावे वर्णानुक्रमानुसार समाविष्ट असतील. असा वर्णानुक्रम हा, प्रस्तावकांची, इतर उमेदवारांची आडनावे, आणि नावे यांसह उमेदवारांच्या आडनावांच्या संदर्भानुसार निर्धारित करण्यात येईल.

(३) मतदान आवश्यक असेल त्याबाबतीत, निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी आपापल्या नामनिर्देशनपत्रामध्ये व्यक्त केलेल्या निशाण्यांच्या पसंतीचा विचार करील, आणि

(अ) निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास, व्यवहार्य असेल तेथवर, त्याच्या पसंतीनुरुप वेगवेगळे चिन्ह नेमून देईल आणि,

(ब) निवडणूक लढविणा-या एकाहून अधिक उमेदवारांनी एकाच निशाणीसाठी आपली पसंती दर्शविली असेल तेव्हा, प्रथम आलेल्याला प्रथम प्राधान्य या तत्त्वावर ती निशाणी नेमून देईल आणि असे नियतवाटप अंतिम असेल. परंतु, जर निवडून द्यावयाच्या एकूण जागांच्या ३० टक्क्यांपेक्षा अधिक उमेदवारांनी एकत्र येऊन गट तयार करून सर्व संबंधित उमेदवारांनी सह्या केलेल्या लेखी सामूहिक अर्जाद्वारे एकाच निशाणीची मागणी केली असेल तेव्हा, त्यांस निवडणूक निर्णय अधिकारी एक सामायिक निशाणी देईल.

(४) प्रत्येक उमेदवारास त्याला नेमून देण्यात आलेल्या निशाणीबाबत तात्काळ कळविण्यात येईल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने पाठविलेला त्या निशाणीचा नमुना निवडणूक निर्णय अधिका-याकडून पुरविण्यात येईल.

३०. **निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी** :—

निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी तयार केल्यानंतर लगेच त्या यादीची एक प्रत त्याच्या कार्यालयाच्या सूचनाफलकावर लावील तसेच त्याची एकेक प्रत निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवाराला, जिल्हा निवडणूक अधिका-याला व संबंधित बाजार समितीला देईल.

३१. **निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक करणे** :—

(१) एखाद्या उमेदवारास, स्वतःचा निवडणूक प्रतिनिधी म्हणून एखाद्या व्यक्तीची नेमणूक करावयाची असल्यास, तो अशी नेमणूक, उप नियम (३) च्या तरतुदींच्या अधीन राहून, नमुना ९ मध्ये करील. उमेदवार अशा नेमणुकीसंबंधीची नोटीस निवडणूक निर्णय अधिका-याला नामनिर्देशनपत्र सादर करतेवेळी किंवा त्यानंतर अथवा त्यापूर्वी केव्हाही किंवा निशाण्यांच्या वाटपाच्या वेळी, नेमणूक पत्र देऊन किंवा अग्रेषित करून देईल.

(२) उमेदवार, स्वतःची सही असलेले एक लेखी प्रतिज्ञापत्र निवडणूक निर्णय अधिका-याकडे दाखल करून निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक कोणत्याही वेळी रद्द करू शकेल. ज्या दिवशी असे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात येईल त्या दिवसापासून अशी नेमणूक रद्द केली जाईल. अशाप्रकारे निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक रद्द करण्यात आली असेल, अथवा त्याचे निधन झाले असेल त्याबाबतीत, मग ही घटना निवडणुकीपूर्वी किंवा निवडणुकीच्या दरम्यान, किंवा निवडणुकीनंतर, परंतु, उमदेवाराच्या निवडणूक खर्चाचा हिशेब निवडणूक निर्णय अधिका-याकडे विहित रीतीने दाखल करण्यापूर्वी घडलेली असो, उमेदवारास, आपला निवडणूक प्रतिनिधी म्हणून अन्य एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि त्यासंबंधीची नोटीस, पहिल्या निवडणूक प्रतिनिधीच्या बाबतीत ती ज्या पद्धतीने देण्यात आली होती त्याच पद्धतीने निवडणूक निर्णय अधिका-याला देण्यात येईल.

(३) उमेदवारास जिचे नाव मतदार यादीत आहे अशा व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमणूक करता येईल.

(४) जी व्यक्ती कोणत्याही अनर्हतेच्या अधीन, उक्त अधिनियम, नियम किंवा उपविधि याअन्वये मतदार म्हणून अनर्ह असेल अशा कोणत्याही व्यक्तीची, जोपर्यंत ती अनर्ह असणे चालू असेल तोपर्यंत किंवा तिचे नाव, ज्या मतदारसंघाकरिता उमेदवार नामनिर्देशित करण्यात आला असेल त्या मतदारसंघाच्या मतदार यादीत नसेल तोपर्यंत, अशा कोणत्याही व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.

३२. **मतदान प्रतिनिधीची आणि मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक** :—

(१) जिचे मतदान घेतले जाणार असेल अशा निवडणुकीत, निवडणूक लढविणा-या कोणत्याही उमेदवारास, प्रत्येक मतदान केंद्रावर, अशा उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी, ज्यांचे नाव मतदार यादीत आहे असा एक प्रतिनिधी आणि एक बदली प्रतिनिधी यांची नेमणूक करता येईल. अशी नेमणूक उमेदवाराच्या सहीने नमुना १० मधील लेखी पत्राद्वारे करण्यात येईल.

(२) उमेदवार ते नेमणुकीचे पत्र मतदान प्रतिनिधीला देईल व तो प्रतिनिधी ते मतदानासाठी निश्चित केलेल्या तारखेस मतदान केंद्राध्यक्षास सादर करील आणि त्याच्या समक्ष, त्यात अंतर्भूत असलेल्या प्रतिज्ञापत्रावर सही करील. मतदान केंद्राध्यक्ष, त्याला सादर केलेले ते पत्र स्वतःच्या ताब्यात ठेवील. मतदान प्रतिनिधीने या नियमाच्या तरतुदींचे पालन केलेले असल्याखेरीज, त्याला मतदान केंद्रावरील कोणतेही काम पार पाडण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

(३) मतदान प्रतिनिधींना, उमेदवाराने, नमुना १० मध्ये दिलेल्या प्राधिकारानुसार मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करता येईल.

(४) निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास, आपल्या सहीने, नमुना १० मधील दोन प्रतीतील लेखी पत्राद्वारे त्याचे मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी, दोनपेक्षा अधिक नसतील इतक्या प्रतिनिधींची नेमणूक करता येईल. मतमोजणीस प्रारंभ करण्यापूर्वी उमेदवार, अशा मतमोजणी प्रतिनिधींच्या नेमणुकीबाबतची सूचना, निवडणूक निर्णय अधिका-याला, नेमणुकीबाबतचे पत्र त्या अधिका-याकडे अग्रेषित करून देईल. उमेदवार नेमणूक पत्राची दुसरी प्रत मतमोजणी प्रतिनिधीलाही देईल. असा मतमोजणी प्रतिनिधी, मतमोजणीकरिता निश्चित केलेल्या तारखेस, निवडणूक निर्णय अधिका-यास ती प्रत सादर करील आणि तिच्यात अंतर्भूत असलेल्या प्रतिज्ञापत्रावर त्याच्या समक्ष सही करील. निवडणूक निर्णय अधिकारी त्याला सादर केलेली दुसरी प्रत स्वतःच्या अभिरक्षेत ठेवून घेईल. कोणत्याही मतमोजणी प्रतिनिधीस, त्याने या तरतुदींचे पालन केलेले असल्याखेरीज, मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी कोणतेही कार्य पार पाडण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

३३. **मतदानापूर्वी उमेदवाराचे निधन होणे** :—

निवडणूक लढविणा-या एखाद्या उमेदवाराचे निधन झाल्यास आणि त्याच्या मृत्यूची बातमी निवडणूक निर्णय अधिका-याला मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मिळाली असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवाराच्या मृत्यूच्या वस्तुस्थितीबद्दल खात्री पटल्यावर, मतदानाबाबत प्रत्यादेश देईल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला निवडणुकीच्या संदर्भातील कार्यवाहीसह त्याबाबत कळवील आणि, निवडणुकीसंदर्भातील सर्व कामकाजास, नवीन निवडणूक असल्याप्रमाणे सर्व बाबतीत, नव्याने प्रारंभ करण्यात येईल :

परंतु, मतदानाबाबत प्रत्यादेश देताना जो निवडणूक लढविणारा उमेदवार होता अशा कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, आणखी नामनिर्देशन करण्याची आवश्यकता असणार नाही :

परंतु, आणखी असे की, मतदानाबाबत प्रत्यादेश देण्यापूर्वी, जिने नियम २८ अन्वये आपली उमेदवारी मागे घेतल्याची नोटीस दिली असेल अशी कोणतीही व्यक्ती, अशा प्रत्यादेशानंतर, निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित केली जाण्यास पात्र असणार नाही :

परंतु, तसेच की, ज्या उमेदवाराचे नामनिर्देशन प्रत्यादेश देण्यापूर्वी स्वीकारले आहे त्या उमेदवाराची उमेदवारी मागे घेण्याची कोणतीही नवीन नोटीस निवडणूक निर्णय अधिकारी अशा प्रत्यादेशानंतरच्या निवडणुकीसाठी स्वीकारणार नाही.

३४. **बिनविरोध निवडणे** :—

नियम २८ अन्वये ज्या मुदतीच्या आत उमेदवारी मागे घेता येईल ती मुदत संपल्यानंतर ज्यांचे नामनिर्देशन स्वीकारण्यात आले आहे अशा मतदारसंघातील उमेदवारांची संख्या ही, भरावयाच्या जागांच्या संख्येएवढी अथवा त्यापेक्षा कमी असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी ती जागा किंवा यथास्थिती, त्या त्या प्रमाणातील जागा भरण्यासाठी असा उमेदवार किंवा असे सर्व उमेदवार यथोचितरीत्या निवडून आले असल्याचे तात्काळ जाहीर करील आणि नमुना ११ मध्ये प्रतिज्ञापत्र करून ते प्रमाणित करील आणि, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास त्याबाबत कळवील.

**भाग सहा**

**मतदानाची गोपनीयता**

३५. **मतदानाची गोपनीयता राखणे**

प्रत्येक अधिकारी, लिपिक, प्रतिनिधी किंवा इतर व्यक्ती जे मतदानाचे किंवा मतमोजणीचे वेळी कर्तव्य पार पाडीत असतील त्यांनी गोपनीयता सांभाळली पाहिजे तसेच काही विशिष्ट कारणासाठी दिलेल्या अधिकाराशिवाय किंवा कोणत्याही कायद्यान्वये अधिकार असल्याखेरीज गोपनीयता सांभाळण्यासाठी मदत केली पाहिजे. तसेच गोपनीयतेचा भंग करता कामा नये.

**भाग सात**

**मतदान**

३६. **लढविण्यात आलेल्या निवडणुकीत मतदान करण्याची रीत**

(१) कलम ३४ द्वारे अंतर्भूत करण्यात आल्याखेरीज अन्य बाबतीत, मतदान घेण्यात येईल.

(२) जेथे मतदान घेण्यात येते त्या प्रत्येक निवडणुकीमध्ये, यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने मतपत्रिकेद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राने मते देण्यात येतील आणि बदली व्यक्तीमार्फत कोणतीही मते स्वीकारण्यात येणार नाहीत.

(३) प्रत्येक मतदाराला सबंधित जागेकरिता एका उमेदवाराला मत देण्याचा अधिकार राहील.

३७. **मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र** :—

प्रत्येक मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र हे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येईल अशा स्वरूपाचे असेल.

३८. **मतपत्रिकेचा नमुना** :—

प्रत्येक मतपत्रिका नमुना १२ मध्ये असेल आणि उमेदवारांची नावे, निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीत ती ज्या क्रमाने असतील त्याच क्रमाने मतपत्रिकेवर लावण्यात येतील. उमेदवाराला एखादे टोपण नाव असल्यास त्याचा समावेश करण्यात येईल. तथापि, दोन किंवा त्याहून अधिक उमेदवारांचे नाव सारखेच असेल तर, त्यांचा व्यवसाय किंवा निवासस्थान याची त्यापुढे भर घालून किंवा, निवडणूक निर्णय अधिकारी ठरवील अशा इतर कोणत्याही रीतीने त्यातील फरक दाखविला जाईल.

३९. **मतदान केंद्रांवरील व्यवस्था** :—

(१) प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेरील बाजूस पुढील गोष्टी प्रदर्शित करण्यात येतील :—

(अ) ज्या क्षेत्राच्या मतदान केंद्रावर मतदारांना मतदान करण्याचा हक्क असेल ते क्षेत्र आणि ज्या मतदान केंद्रात एकाहून अधिक मतदान केंद्र असतील, अशा प्रत्येक मतदान केंद्रनिहाय, अशा केंद्रांसाठी नेमून दिलेल्या मतदारांचा तपशील विनिर्दिष्ट करणारी एक नोटीस, आणि

(ब) निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या त्यांना नेमून दिलेल्या निशाण्यांसह त्यांच्या यादीची एक प्रत.

(२) प्रत्येक मतदान केंद्रामध्ये, ज्यात मतदारांना, कोणाच्याही निरीक्षणाविना त्याची मते नोंदविता येतील असे एक किंवा अधिक मतदान कक्ष उभारण्यात येतील.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक मतदान केंद्राला पुरेशा प्रमाणात मतपेट्या किंवा इलेक्ट्रोनिक मतदान यंत्रे, मतपत्रिका, अशा मतदान केंद्रात ज्या क्षेत्रातील मतदारांना मतदानाचा हक्क आहे त्या मतदान क्षेत्रातील किंवा क्षेत्रांतील मतदारांच्या यादीच्या प्रती, मतपत्रिकांवर विभेदक खुणेचा ठसा उमटविण्यासाठी साधने आणि मतपत्रिकांवर खूण करण्यासाठी मतदारांना आवश्यक असलेल्या वस्तू पुरवील. निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक मतदान केंद्राला, अशा मतदान केंद्रात मतदान घेण्यासाठी आवश्यक असतील अशी इतर साधनसामग्री आणि उपसाधनेही पुरवील.

४०. **मतदान केंद्रात प्रवेश** :—

मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्रात कोणत्याही एका वेळी प्रवेश देण्यासाठी मतदारांचे प्रमाण नियमित करील आणि पुढील व्यक्तींव्यतिरिक्त इतर व्यक्तींना प्रवेश देणार नाही :—

(अ) मतदान अधिकारी ;

(ब) निवडणुकीशी संबंधित कामावर असलेले लोकसेवक ;

(क) निवडणूक अधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती ;

(ड) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी आणि नियम ३२ च्या तरतुदींस अधीन राहून, प्रत्येक उमेदवाराचा एक मतदान प्रतिनिधी ;

(ई) मतदाराबरोबर असलेले कडेवरील मूल ;

(फ) मदतीशिवाय ज्याला हालचाल करता येत नाही अशा, अंध किंवा अपंग मतदारासोबत असलेली एखादी व्यक्ती ;

(ग) मतदाराची ओळख पटविण्याच्या प्रयोजनासाठी निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष नियुक्त करील अशा इतर व्यक्ती.

४१. **मतदानासाठी मतपेट्या तयार करणे** :—

(१) मतपेटीच्या सुरक्षिततेसाठी एखादी कागदी मोहोर वापरात आणण्यात आली असेल त्याबाबतीत, मतदान केंद्राध्यक्ष, त्या कागदी मोहोरेवर आपली स्वतःची सही करील आणि उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींपैकी ज्यांची त्यावर सह्या करण्याची इच्छा असेल त्यांच्या सह्या घेईल.

(२) मतदान केंद्राध्यक्ष, त्यानंतर अशा रीतीने स्वाक्षरित केलेली कागदी मोहोर, तिच्यासाठी मतपेटीत ठेवलेल्या जागी लावील आणि त्यानंतर त्या मतपेटीत मतपत्रिका टाकण्यासाठी फट उघडी राहील अशा रीतीने ती पेटी सुरक्षित आणि मोहोरबंद करील.

(३) मतपेटी सुरक्षित करण्यासाठी वापरण्यात आलेली मोहोर व अशा रीतीने लावण्यात येईल की, जेणेकरून पेटी बंद केल्यानंतर मोहोर तोडल्याशिवाय ती उघडता येऊ शकणार नाही.

(४) मतपेटी सुरक्षित करण्यासाठी कागदी मोहोरांचा वापर करणे आवश्यक नसेल त्याबाबतीत, मतदान केंद्राध्यक्ष, मतपेटीत मतपत्रिका टाकण्यासाठी फट उघडी राहील अशारितीने मतपेटी सुरक्षित व मोहोरबंद करील आणि उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना, त्यांची इच्छा असल्यास, त्यांच्या मोहोरा लावण्यास परवानगी देईल.

(५) मतदान केंद्रात वापरण्यात आलेल्या प्रत्येक मतपेटीला आतून आणि बाहेरून दोन्ही बाजूंस, पुढील गोष्टी चिन्हांकित असलेल्या मोहोरा लावलेल्या असल्या पाहिजेत :—

(अ) मतदारसंघाचा अनुक्रमांक, कोणताही असल्यास आणि त्याचे नाव ;

(ब) मतदान केंद्राचा अनुक्रमांक आणि त्याचे नाव ;

(क) मतदान संपल्यावर मतपेटीच्या केवळ बाहेरील बाजूकडील खूणचिठ्ठीवर लिहावयाचा आहे असा मतपेटीचा अनुक्रमांक, आणि

(ड) मतदानाच दिनांक.

(६) मतदानास प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वी, मतदान केंद्राध्यक्ष, उपस्थित मतदान प्रतिनिधींना आणि इतर व्यक्तींना मतपेटी रिकामी असल्याचे आणि तिच्यावर, या नियमांच्या उपनियम (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या खूणचिठ्ठ्या असल्याचे दाखवील.

(७) त्यानंतर मतपेटी बंद करून मोहोरबंद आणि सुरक्षित करण्यात येईल आणि ती, मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान प्रतिनिधी यांच्या नजरेसमोर राहील अशा जागी ठेवण्यात येईल.

४२. **मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र तयार करणे** :—

जर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामार्फत मतदान घेण्याचे ठरविलेले असेल तर, या नियमानुसार तांत्रिकदृष्ट्या जितपत शक्य असेल तितपत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून त्याबाबतची कार्यपद्धती विनिर्दिष्ट करण्यात येईल.

४३. **मतदारांची ओळख पटविणे** :—

(१) मतदान केंद्राध्यक्षास मतदान केंद्रावर मतदारांची ओळख पटविण्यासाठी किंवा मतदान घेताना त्याला सहाय्य करण्यासाठी, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तींची नियुक्ती करता येईल.

(२) प्रत्येक मतदार मतदान केंद्रात प्रवेश करतेवेळी, भारताचा निवडणूक आयोग, केंद्र सरकार अथवा राज्य शासन यांच्याकडून विहित करण्यात आलेला छायाचित्र असलेला ओळखीचा पुरावा स्वतः जवळ बाळगील.

(३) प्रत्येक मतदार मतदान केंद्रात प्रवेश करील तेव्हा, मतदान केंद्राध्यक्ष किंवा याबाबत त्याने प्राधिकृत केलेला मतदान अधिकारी मतदाराचे नाव आणि इतर तपशील मतदार यादीतील संबंधित नोंदीशी ताडून पाहील आणि त्यानंतर मतदाराचा अनुक्रमांक, नाव, इतर तपशील पुकारील.

(४) एखाद्या व्यक्तीच्या, मतपत्रिका मिळविण्याच्या अधिकाराबाबत निर्णय घेताना, मतदान केंद्राध्यक्ष किंवा यथास्थिती, मतदान अधिकारी, मतदार यादीतील कोणत्याही नोंदीतील लेखन वा मुद्रण दोषांकडे, ज्या मतदाराशी ती नोंद संबंधित आहे तो मतदार आणि ती व्यक्ती एकच आहे याबाबत त्यांची खात्री झाली तर, दुर्लक्ष करील.

४४. **ओळखीबाबत आक्षेप घेणे** :—

(१) कोणत्याही मतदान प्रतिनिधीस, आपण विशिष्ट मतदार आहोत असा दावा करणा-या एखाद्या व्यक्तीच्या ओळखीबाबत, मतदान केंद्राध्यक्षाकडे अशा प्रत्येक आक्षेपासाठी ५० रुपये याप्रमाणे रोख रक्कम जमा करून आक्षेप घेता येईल.

(२) अशी रक्कम त्या व्यक्तीने जमा केल्यावर, मतदान केंद्राध्यक्ष,—

(अ) जिला आक्षेप घेतलेला आहे, त्या व्यक्तीस तोतयेगिरीबद्दल होणा-या शास्तीसंबंधी इशारा देईल ;

(ब) मतदार यादीतील संबंधित नोंद संपूर्णपणे वाचील आणि त्या नोंदीत निर्दिष्ट केलेली व्यक्ती तीच आहे किंवा काय याबाबत तिच्याकडे विचारणा करील ;

(क) नमुना क्रमांक १३' मधील आक्षेपित मतदारांच्या यादीत तिचे नाव आणि पत्ता नोंदवील, आणि

(ड) उक्त यादीत तिची सही करण्यास तिला फर्मावील,

(३) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष, आक्षेपाबाबत संक्षिप्त चौकशी करील आणि त्यास त्या प्रयोजनासाठी—

(अ) आक्षेप घेणा-या व्यक्तीस आक्षेपाबाबत पुरावा दाखल करण्यास आणि जिच्याबाबत आक्षेप घेतलेला असेल त्या व्यक्तीस तिच्या ओळखीबाबतचा पुरावा दाखल करण्यास भाग पाडता येईल ;

(ब) आक्षेप घेतलेल्या व्यक्तीस, तिची ओळख पटवून देण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेला कोणताही प्रश्न विचारता येईल

आणि तिला शपथेवर उत्तर देण्यास भाग पाडता येईल ; आणि

(क) आक्षेप घेतलेल्या व्यक्तीस आणि साक्षीपूरावा देऊ करणा-या इतर कोणत्याही व्यक्तीस शपथ घेण्यास लावता येईल ;

(४) जर, चौकशीनंतर, मतदान केंद्राध्यक्षास, आक्षेप सिद्ध झालेला नाही असे वाटल्यास तो, जिच्याबाबत आक्षेप घेतलेला असेल त्या व्यक्तीस मतदानाची परवानगी देईल आणि आक्षेप सिद्ध झालेला आहे असे त्यास वाटल्यास आक्षेप घेतलेल्या व्यक्तीस मतदान करण्यास मनाई करता येईल ;

(५) जर मतदान केंद्राध्यक्षाच्या मते आक्षेप क्षुल्लक स्वरूपाचा असेल किंवा सद्भावनापूर्वक घेण्यात आला नसेल तर, तो उपनियम (१) अन्वये ठेवलेली अनामत रक्कम निवडणूक निधीमध्ये जमा करण्यात यावी असा निदेश देईल आणि इतर कोणत्याही बाबतीत, तो चौकशी करून आक्षेप घेणा-या व्यक्तीस ती रक्कम परत करील.

४५. **तोतयेगिरीविरुद्ध खबरदारी घेणे** :—

(१) मतदारांच्या तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने, ज्याच्या ओळखीबाबत मतदान केंद्राध्यक्ष किंवा, यथास्थिती, मतदान अधिकारी याची खात्री पटली असेल असा प्रत्येक मतदार, मतदान केंद्राध्यक्षाला किंवा मतदान अधिका-याला आपल्या डाव्या अंगठ्याची तपासणी करण्यास आणि त्यावर पक्क्या शाईची खूण करण्यास परवानगी देईल.

(२) जर कोणताही मतदार उपनियम (१) अनुसार, त्याच्या डाव्या अंगठ्याचे निरीक्षण करू देण्यास किंवा त्यावर खूण करू देण्यास नकार देईल किंवा त्याच्या डाव्या अंगठ्यावर आधीच अशी खूण केलेली असेल किंवा शाईची खूण काढून टाकण्याच्या हेतूने तो कोणतेही कृत्य करील तर, त्यास कोणतीही मतपत्रिका दिली जाणार नाही किंवा मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

(३) मतदाराच्या डाव्या अंगठ्यासंबंधीचा या नियमातील कोणताही निर्देश हा, जर मतदाराला डावा अंगठा नसेल तर त्याबाबतीत त्याच्या डाव्या हाताच्या इतर कोणत्याही बोटासंबंधीचा निर्देश आहे असे समजले जाईल आणि त्याच्या डाव्या हाताची सर्व बोटेच नसतील त्या बाबतीत, तो त्याच्या उजव्या हाताचा अंगठा किंवा इतर कोणतेही बोट यासंबंधीचा निर्देश आहे असे समजले जाईल आणि दोन्ही हातांची सर्व बोटे नसतील त्या बाबतीत त्याला असलेल्या त्याच्या डाव्या किंवा उजव्या हाताचे टोक यासंबंधीचा निर्देश आहे, असे समजले जाईल.

४६. **मतपत्रिका देणे** :—

(१) मतदान सुरु करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी कोणत्याही मतदारास कोणतीही मतपत्रिका देण्यात येणार नाही.

(२) मतदान समाप्त होण्याच्या वेळी मतदान केंद्रावर जे मतदार उपस्थित असतील त्यांच्याखेरीज, इतर कोणत्याही मतदारास, मतदान समाप्तीसाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर कोणतीही मतपत्रिका देण्यात येणार नाही. अशा मतदारांना मतदान संपल्यानंतरही त्यांची मते नोंदविण्याची परवानगी देण्यात येईल.

(३) मतदाराला मतपत्रिका देण्यापूर्वी प्रत्येक मतपत्रिकेवर :—

(अ) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी निदेश देईल अशा विभेदक चिन्हाचा शिक्का मारण्यात येईल ; आणि

(ब) तिच्या मागच्या बाजूस मतदान केंद्राध्यक्ष पूर्ण स्वाक्षरी करील.

(४) मतदाराला मतपत्रिका देतेवेळी, मतदान अधिकारी, नोंद करण्यासाठी स्वतंत्रपणे ठेवलेल्या मतदारांच्या यादीच्या प्रतीमध्ये त्या मतदाराच्या नावासमोर मतपत्रिकेच्या अनुक्रमांकाची नोंद करील.

(५) उपनियम (४) मध्ये तरतूद केली असेल ते खेरीजकरून, मतदान केंद्रातील कोणतीही व्यक्ती, विशिष्ट मतदारांना दिलेल्या मतपत्रिकांचे अनुक्रमांक टिपून घेणार नाही.

४७. **मतदानाची कार्यपद्धती** :—

(१) मतपत्रिका मिळाल्यावर, मतदार ताबोडतोब—

(एक) मतदान कक्षांपैकी एका मतदान कक्षाकडे जाईल ;

(दोन) ज्या उमेदवाराला मत देण्याची त्याची इच्छा असेल त्या उमेदवाराच्या निशाणीवर किंवा तिच्याजवळ, त्याला त्या प्रयोजनासाठी पुरविण्यात आलेल्या साधनाने खूण करील ;

(तीन) आपले मत दिसू नये यासाठी मतपत्रिकेची घडी करील ;

(चार) आवश्यक वाटल्यास, मतपत्रिकेवरील विभेदक चिन्ह मतदान केंद्राध्यक्षास दाखवील ;

(पाच) घडी केलेली मतपत्रिका मतपेटीत टाकील ;

(सहा) मतदान केंद्रातून निघून जाईल.

(२) एक मतदार मतदान कक्षात असताना दुस-या कोणत्याही मतदारास आत प्रवेश देण्यात येणार नाही.

४८. **अंध किंवा अपंग मतदारांच्या मताची नोंदणी** :—

(१) अंधत्वामुळे किंवा इतर शारीरिक अपंगत्वामुळे एखाद्या मतदारास मतपत्रिकेवरील निशाण्या ओळखणे अशक्य आहे किंवा सहाय्याशिवाय मतपत्रिकेवर खूण करणे अशक्य आहे याविषयी मतदान केंद्राध्यक्षाची खात्री पटली असेल तर, मतदान केंद्राध्यक्ष, त्या मतदारास, त्याच्यावतीने व त्याच्या इच्छेनुसार, मतपत्रिकेवर मत नोंदविण्यासाठी आणि आवश्यक असल्यास, मत गुप्त राहावे म्हणून मतपत्रिकेची घडी करून ती मतपेटीत टाकण्यासाठी, ज्याचे वय १८ वर्षांहून कमी नाही असा एखादा सोबती मतदान कक्षात त्याच्याबरोबर नेण्यास परवानगी देईल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही मतदान केंद्रावर त्याच दिवशी एकाहून अधिक मतदारांचा सोबती म्हणून काम करण्यास परवानगी दिली जाणार नाहीः

परंतु, आणखी असे की, या नियमान्वये कोणत्याही दिवशी, मतदाराचा सोबती म्हणून काम करण्यास एखाद्या व्यक्तीस परवानगी देण्यापूर्वी, त्याने मतदाराच्या वतीने नोंदविलेले मत तो गुप्त ठेवील आणि त्याने त्याच दिवशी यापूर्वी दुस-या एखाद्या मतदाराचा सोबती म्हणून कोणत्याही मतदान केंद्रावर काम केलेले नाही, असे त्याने नमुना-१४ मध्ये जाहीर करणे आवश्यक असेल.

(२) मतदान केंद्राध्यक्ष, या नियमाखालील अशा सर्व प्रकरणांची नोंद नमुना १५ मध्ये ठेवील.

४९. **खराब झालेल्या आणि परत केलेल्या मतपत्रिका** :—

(१) एखाद्या मतदाराने अनवधानाने आपली मतपत्रिका, अशा रीतीने वापरली असेल की, मतपत्रिका म्हणून तिचा सोयीस्करपणे वापर करणे शक्य नसेल तर, त्या मतदारास ती मतदान केंद्राध्यक्षाकडे परत करता येईल आणि ही गोष्ट अनवधानाने घडल्याबद्दल केंद्राध्यक्षाची खात्री पटवून दिल्यानंतर त्याला दुसरी मतपत्रिका देण्यात येईल आणि अशा परत केलेल्या मतपत्रिकेवर मतदान केंद्राध्यक्ष "खराब झाली, रद्द केली" असा मजकूर लिहील (चिन्हाकित करील).

(२) एखाद्या मतदाराने मतपत्रिका मिळाल्यावर तिचा उपयोग न करण्याचे ठरविल्यास, तो, ती मतपत्रिका मतदान केंद्राध्यक्षाकडे परत करील आणि अशा रीतीने परत केलेल्या मतपत्रिकेवर मतदान केंद्राध्यक्ष "परत केलेली रद्द केलेली" असा मजकूर लिहील (असे चिन्हाकित करील)

(३) उपनियम (१) किंवा उपनियम (२) अन्वये रद्द करण्यात आलेल्या सर्व मतपत्रिका वेगळ्या पाकिटात ठेवण्यात येतील.

५०. **दुबार नोंदलेली मते** :—

(१) आपण अमुक एक मतदार आहोत असे सांगून एखादी व्यक्ती मतदान करून गेल्यानंतर, जर दुसरी एखादी व्यक्ती आपण तोच विशिष्ट मतदार आहोत असे सांगून मतपत्रिकेची मागणी करील तर, त्या व्यक्तीस स्वतःची ओळख पटवून देण्यासंबंधात, मतदान केंद्राध्यक्ष विचारील, अशा प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिल्यानंतर, या नियमांच्या पुढील तरतुदींना अधीन राहून, इतर कोणत्याही मतदाराप्रमाणे (यात यापुढे "दुबार नोंदलेल्या मतपत्रिका" असा निर्देश करण्यात आला आहे) मतपत्रिकेवर खूण करण्याचा हक्क असेल.

(२) अशी प्रत्येक व्यक्ती, दुबार नोंदलेली मतपत्रिका मिळण्यापूर्वी, नमुना १६ मधील सूचीतील तिच्याशी संबंधित नोंदीसमोर आपल्या नावाची सही करील.

(३) दुबार नोंदलेली मतपत्रिका, मतदानासाठी वापरण्यात येणा-या इतर मतपत्रिकांप्रमाणेच असेल; फक्त—

(अ) ती मतदान केंद्रावर उपयोगात आणण्यासाठी देण्यात आलेल्या मतपत्रिकांच्या गठ्ठयातील शेवटच्या क्रमांकाची असेल; आणि

(ख) तिच्या मागच्या बाजूवर मतदान केंद्राध्यक्षांने "दुबार नोंदलेली मतपत्रिका" असे स्वतः लिहून त्यावर स्वतःची सही केलेली असेल.

(४) दुबार नोंदलेल्या मतपत्रिकेवर मतदान कक्षात जाऊन खूण केल्यावर, मतपत्रिकेची घडी घालून मतदार ती मतपत्रिका, मतपेटीत न टाकता मतदान केंद्राध्यक्षाकडे देईल, व मतदान केंद्राध्यक्ष ती मतपत्रिका त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या लिफाफ्यात ठेवील.

५१. **मतदान समाप्त करणे** :—

(१) मतदान केंद्राध्यक्ष, नियम १८ अन्वये याबाबतीत निश्चित करण्यात आलेल्या वेळी मतदान केंद्र बंद करील आणि त्यानंतर कोणत्याही मतदाराला मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही :

परंतु, मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी, तेथे हजर असलेल्या सर्व मतदारांना मतदान करू देण्यात येईल.

(२) मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी एखादा मतदार तेथे हजर होता किंवा कसे असा प्रश्न उद्‌भवल्यास, त्या बाबतीत मतदान केंद्राध्यक्ष निर्णय देईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

५२. **मतदानानंतर मतपेट्या मोहोरबंद करणे** :—

(१) मतदान समाप्त झाल्यानंतर व्यवहार्य असेल तेथवर, मतदान केंद्राध्यक्ष कोणत्याही उमेदवारांच्या किंवा त्यांच्या मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतपेटीची फट बंद करील आणि फट बंद करण्यासाठी मतपेटीला कोणतीही यांत्रिक कळ नसेल तर तो, ती फट मोहोरबंद करील आणि हजर असलेल्या कोणत्याही मतदान प्रतिनिधींना त्याची स्वतःची मोहोर लावण्यास परवानगी देईल.

(२) त्यानंतर ती मतपेटी मोहोरबंद करण्यात येईल व सुरक्षित ठेवली जाईल.

(३) पहिली मतपेटी भरल्यामुळे दुस-या मतपेटीचा उपयोग करणे भाग पडले तर, दुस-या मतपेटीचा उपयोग करण्यापूर्वी प्रथम पहिली मतपेटी उप नियम (१) व (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे बंद करून मोहोरबंद केली जाईल; व सुरक्षित ठेवली जाईल.

५३. **मतपत्रिकांचा हिशेब** :—

(१) मतदान संपल्यांनतर मतदान केंद्राध्यक्ष, मतपत्रिकांच्या हिशेबाची नोंद नमुना क्रमांक-१७ मध्ये करील व तो नमुना निराळ्या पाकिटात भरून त्यावर "मतपत्रिकांचा हिशेब" असे शब्द लिहील.

(२) एखाद्या मतदान प्रतिनिधीची, मतपत्रिकांच्या हिशेबात केलेल्या नोंदीची सत्यप्रत घेण्याची इच्छा असेल तर, मतदान केंद्राध्यक्ष त्याला तसे करण्याची परवानगी देईल व सत्यप्रत म्हणून ती साक्षांकित करील.

५४. **इतर पाकिटे मोहोरबंद करणे** :—

(१) मतदान केंद्राध्यक्ष नंतर पुढीलप्रमाणे निरनिराळी पाकिटे तयार करील :—

(अ) खुणा केलेली मतदारांच्या यादीची प्रत ;

(ब) न वापरलेल्या मतपत्रिका ;

(क) खराब झालेल्या व परत केलेल्या मतपत्रिका ;

(ड) दुबार नोंदलेल्या मतपत्रिका आणि दुबार नोंदलेल्या मतपत्रिकांची यादी असलेला लिफाफा;

(ई) आक्षेपित मतांची यादी; आणि

(फ) निवडणूक निर्णय अधिका-यांनी दिलेल्या निदेशानुसार मोहोरबंद पाकिटात ठेवावयाची इतर कोणतीही कागदपत्रे.

(२) असे प्रत्येक पाकीट, मतदान केंद्राध्यक्षाची आणि उपस्थित असणा-या मतदान प्रतिनिधींपैकी मोहोर लावण्याची ज्यांची इच्छा असेल अशा प्रतिनिधींची मोहोर लावून, मोहोरबंद करण्यात येईल.

५५. **मतपेट्या, पाकिटे इत्यादी निवडणूक निर्णय अधिका-याकडे पाठविणे** :—

(१) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष, खालील वस्तू, निवडणूक निर्णय अधिकारी निदेश देईल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिका-याच्या स्वाधीन करील किंवा स्वाधीन करण्याची व्यवस्था करील,—

(अ) मतपेट्या ;

(ब) मतपत्रिकांचा हिशेब ;

(क) नियम ५४ मध्ये निर्दिष्ट केलेली, मोहोरबंद केलेली पाकिटे ; आणि

(ड) मतदानाच्या वेळी वापरलेली इतर सर्व कागदपत्रे.

(२) मतमोजणी सुरु होईपर्यंत, निवडणूक निर्णय अधिकारी सर्व मतपेट्या, पाकिटे आणि इतर कागदपत्रे यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी आणि त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी पुरेशी व्यवस्था करील.

५६. **मतपेट्या नष्ट इत्यादी झाल्यास नव्याने मतदान घेणे** :—

(१) जर एखाद्या निवडणुकीच्या वेळी,—

(अ) एखाद्या मतदान केंद्रावर उपयोगात आणलेली कोणतीही मतपेटी, मतदान केंद्राध्यक्ष किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अभिरक्षेतून बेकायदेशीरपणे काढून घेण्यात आली किंवा ती अपघाताने किंवा हेतुपूर्वक नष्ट करण्यात आली किंवा गहाळ करण्यात आली किंवा त्या मतदान केंद्रावर निकाल निश्चित ठरवणे अशक्य होईल इतक्या प्रमाणात तिची नासधूस करण्यात आली किंवा तीत ढवळाढवळ करण्यात आली; किंवा

(ब) जिच्यामुळे मतदानावर अनिष्ट परिणाम घडण्याची शक्यता असेल अशी कोणतीही चूक किंवा नियमबाह्यता कार्यपद्धतीत घडली, तर निवडणूक निर्णय अधिकारी ती गोष्ट जिल्हा निवडणूक अधिकारी यांना ताबडतोब कळवील.

(२) जिल्हा निवडणूक अधिकारी असा अहवाल मिळाल्यावर किंवा या नियमातील उप नियम (१) सर्व महत्त्वपूर्ण परिस्थिती विचारात घेतल्यानंतर, किंवा या नियमातील उप नियम (१) मध्ये उल्लेखिलेली परिस्थिती स्वतः विचारात घेऊन आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सर्वसाधारण अथवा विशेष आदेशांना अधीन राहून, एकतर—

(अ) त्या मतदान केंद्रावरील मतदान निरर्थक असल्याचे घोषित करील, त्या मतदान केंद्रावर नव्याने निवडणूक घेण्यासाठी एखादा दिवस नेमील आणि वेळ निश्चित करील. त्यास योग्य वाटेल अशा रितीने असा नेमलेला दिवस व अशी निश्चित केलेली वेळ अधिसूचित करील ; किंवा

(ब) त्या मतदान केंद्रावर नव्याने घेतलेल्या मतदानाच्या निकालाचा निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही किंवा कार्यपद्धतीमधील चूक किंवा नियमबाह्यता तेवढी मोठी नाही याबद्दल खात्री झाल्यास, तो निवडणूक निर्णय अधिका-यास निवडणुकीसाठी त्यास योग्य वाटतील असे निदेश देईल किंवा अशी कार्यवाही करील.

(३) या अधिनियमाच्या तरतुदी किंवा त्याखाली केलेले नियम हे, मूळ मतदानास ज्याप्रमाणे लागू होतात, त्याप्रमाणे अशा प्रत्येक मतदानाला लागू होतील.

## भाग आठ

## मतमोजणी व निवडणूक निकाल जाहीर करणे

५७. **मतमोजणी** :—

मतदान घेतलेल्या प्रत्येक निवडणुकीत, निवडणूक निर्णय अधिका-याच्या पर्यवेक्षणानुसार किंवा पर्यवेक्षणाखाली आणि निदेशानुसार किंवा निदेशाखाली मतमोजणी करण्यात येईल आणि निवडणूक लढविणारा प्रत्येक उमेदवार आणि त्याचा मतमोजणी प्रतिनिधी यांस मतमोजणीच्या वेळी उपस्थित राहण्याचा अधिकार असेल. निवडणूक निर्णय अधिकारी, मतमोजणी प्रक्रिया मुक्त, निःपक्ष व पारदर्शक रितीने चालावी म्हणून प्रत्येक उमेदवारामागे आवश्यक असेल अशा संख्येत उमेदवारांच्या मतमोजणी प्रतिनिधींना हजर राहू देईल.

५८. **मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी प्रवेश** :—

(१) निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी,—

(अ) मतमोजणीत त्याला सहाय्य करण्यासाठी तो नेमणूक करील अशा व्यक्ती;

(ब) जिल्हा निवडणूक अधिका-याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती;

(क) निवडणुकीच्या संबंधात कामावर असलेले लोकसेवक; आणि

(ड) उमेदवार व त्यांचे मतमोजणी प्रतिनिधी,

यांच्या व्यतिरिक्त इतर व्यक्तींना प्रवेश देणार नाही.

(२) उप नियम (१) च्या खंड (क) अन्वये, संस्थेने नियुक्त केलेल्या किंवा अन्यथा निवडणुकीत उमेदवारासाठी काम करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करण्यात येणार नाही.

(३) एखाद्या विशिष्ट टेबलावरील किंवा टेबलांच्या गटावरील मतमोजणीवर कोणता मतमोजणी प्रतिनिधी लक्ष ठेवील किंवा कोणते प्रतिनिधी लक्ष ठेवतील हे निवडणूक निर्णय अधिकारी ठरवील.

(४) मतमोजणीच्या वेळी स्वतः गैरवर्तणूक करणा-या किंवा निवडणूक निर्णय अधिका-याच्या कायदेशीर निदेशांचे पालन करण्यात कसूर करणा-या कोणत्याही व्यक्तीस, जेथे मतमोजणी चालू असेल त्या जागेतून, निवडणूक निर्णय अधिकारी किंवा कर्तव्य बजावणारा कोणताही पोलीस अधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिकारी याबाबतीत प्राधिकृत करील अशी कोणतीही व्यक्ती बाहेर काढील.

५९. **मतपेट्यांची छाननी व त्या उघडणे** :—

(१) निवडणूक निर्णय अधिका-यास, एकाहुन अधिक मतदान केंद्रात वापरलेल्या मतपेट्या एकाच वेळी उघडून त्यांतील मतपत्रिकांची मोजणी करून घेता येईल.

(२) मतमोजणीच्या टेबलावर कोणतीही मतपेटी उघडण्यापूर्वी, त्या टेबलाजवळ उपस्थित असलेल्या मतमोजणी प्रतिनिधीस, मतपेटीवर लावण्यात आली असेल अशी कागदी मोहोर किंवा इतर कोणतीही मोहोर तपासून पाहण्यास व ती जशीच्या तशीच आहे याबद्दल स्वतःची खात्री करून घेण्यास परवानगी देण्यात येईल.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी, कोणत्याही मतपेटीत खरोखरच फेरफार करण्यात आलेला नाही याबद्दल स्वतःची खात्री करून घेईल. तो फेरफार करण्यात आलेल्या मतपेटीतील मतपत्रिकांची मोजणी करणार नाही आणि त्या मतदान केंद्राच्या बाबतीत नियम ५२ मध्ये ठरवून दिलेली कार्यपद्धती अनुसरील.

६०. **मतपत्रिकांची छाननी व त्या बाद करणे** :—

(१) प्रत्येक मतपेटीतून काढलेल्या मतपत्रिकांचे सोईस्कर असे गठ्ठे करण्यात येतील व त्यांची छाननी करण्यात येईल.

(२) (अ) मतपत्रिकेवर, मतदार ओळखणे शक्य होईल अशाप्रकारची कोणतीही खूण किंवा लिखाण असेल, किंवा;

(ब) तीवर मत नोंदविलेले नसेल, किंवा

(क) एकच उमेदवार निवडावयाचा असेल त्यावेळी, त्या मतपत्रिकेवर एकापेक्षा अधिक मतदारांना मते दिली असतील ; किंवा

(ड) एकापेक्षा अधिक उमेदवार निवडावयाचे असतील त्या वेळी, मतदाराने मतपत्रिकेवर जेवढी मते देण्याचा त्याचा हक्क असेल त्याहून अधिक मते नोंदवलेली असतील, किंवा

(इ) कोणत्या मतदारास मत देण्यात आले आहे याबद्दल शंका निर्माण व्हावी अशा रितीने मतपत्रिकेवरील मत दर्शवणारी खूण केलेली असेल, किंवा

(फ) ती मतपत्रिका बनावट असेल, किंवा

(ग) ती मतपत्रिका खरीखुरी मतपत्रिका म्हणून ओळखता येणार नाही इतकी खराब झाली असेल किंवा छिन्नविछिन्न झाली असेल, किंवा

(ह) त्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक किंवा तिचे स्वरूप हे, मतदान केंद्रावर वापरण्यासाठी अधिकृत केलेल्या मतपत्रिकेच्या अनुक्रमांकापेक्षा किंवा, यथास्थिती, स्वरुपापेक्षा भिन्न असेल, किंवा

(आय) नियम ४७ च्या उप नियम (३) च्या तरतुदींन्वये मतपत्रिकेवर असावयास हवी अशी खूण तीवर नसेल तर,

निवडणूक निर्णय अधिकारी ती मतपत्रिका बाद ठरवील :

परंतु,—

(अ) या उप नियमाच्या खंड (ज) किंवा (झ) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे असणारा कोणताही दोष हा, मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी यांच्या कोणत्याही चुकीमुळे किंवा कसुरीमुळे निर्माण झाला आहे याविषयी निवडणूक निर्णय अधिका-याची खात्री पटल्यास, केवळ अशा दोषाच्या कारणास्तव ती मतपत्रिका बाद ठरवण्यात येणार नाही ;

(ब) दिलेले मत हे विशिष्ट उमेदवारासाठीच आहे हा हेतू मतपत्रिकेवर केलेल्या खुणेमुळे स्पष्ट होत असेल तर, मत दर्शवणारी खूण ही अस्पष्ट आहे किंवा एकाहून अधिक वेळा केली आहे केवळ याच कारणास्वत ती मतपत्रिका बाद ठरवण्यात येणार नाही.

(३) उप नियम (२) अन्वये कोणतीही मतपत्रिका बाद ठरविताना, निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित असलेल्या प्रत्येक मतमोजणी प्रतिनिधीस मतपत्रिका तपासण्याची वाजवी संधी देईल.

(४) बाद केलेल्या प्रत्येक मतपत्रिकेच्या मागे निवडणूक निर्णय अधिकारी रबरी ठशाच्या सहाय्याने 'बाद' अशी अक्षरे लिहील आणि बाद केल्याची कारणे संक्षिप्तपणे नमूद करील.

(५) या नियमान्वये बाद केलेल्या सर्व मतपत्रिका एका गठ्ठयात एकत्रित करण्यात येतील.

६१. **मतमोजणीची कार्यपद्धती** :—

(१) नियम ६० अन्वये बाद करण्यात न आलेली प्रत्येक मतपत्रिका एक वैध मत म्हणून मोजण्यात येईल :

परंतु, दुबार नोंदलेल्या मतपत्रिका असलेला लिफाफा उघडला जाणार नाही आणि अशा मतपत्रिकेची मोजणी केली जाणार नाही.

(२) मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या सर्व मतपेट्यांमध्ये असलेल्या सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी नमुना १८ मधील निकाल पत्रकात नोंदी करील आणि तपशील जाहीर करील.

(३) त्यानंतर वैध मतपत्रिकांचा एकत्रित गठ्ठा करण्यात येईल आणि बाद मतपत्रिकांच्या गठ्ठयाबरोबरच तो एका वेगळ्या पाकिटात ठेवण्यात येईल. ते पाकीट मोहोर लावून बंद करण्यात येऊन त्यावर पुढील तपशील नमूद करण्यात येईल :

(अ) मतदारसंघाचे नाव ;

(ब) ज्या मतदान केंद्रावर मतपत्रिकांचा उपयोग करण्यात आला आहे त्या केंद्राचा तपशील, आणि

(क) मतमोजणीची तारीख.

६२. **मतमोजणी सतत चालू ठेवणे** :—

निवडणूक निर्णय अधिकारी, शक्य असेल तेथवर मतमोजणीचे काम सतत चालू ठेवील आणि मतमोजणी तहकूब करावी लागणार असेल अशा मध्यंतराच्या कोणत्याही कालावधीत मतपत्रिका, पाकिटे व निवडणुकीच्या संबंधातील इतर कागद, स्वतःची मोहोर लावून आणि ज्याची इच्छा असेल अशा उमेदवारांची किंवा मतमोजणी प्रतिनिधींची मोहोर लावून, मोहोरबंद करील आणि अशा मध्यंतरामध्ये ते त्याच्या सुरक्षित अभिरक्षेत राहतील याबद्दल पुरेशी खबरदारी घेण्याची व्यवस्था करील.

६३. **नव्याने मतदान घेण्यात आल्यानंतर मतमोजणीस पुन्हा सुरूवात करणे** :—

(१) नियम ५६ अन्वये नव्याने मतदान घेण्यात आल्यास, ते मतदान पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी, त्याने त्याबाबतीत निश्चित केली असेल आणि त्याबद्दल उमेदवारांना पूर्वीच सूचना देण्यात आलेली असेल अशा दिनांकास, वेळेस व ठिकाणी मतमोजणीस पुन्हा सुरूवात करील.

(२) नियम ६१ आणि ६२ च्या तरतुदी, शक्य असतील तेथवर, अशा नंतरच्या मतमोजणीस लागू होतील.

६४. **मतांची फेरमोजणी** :—

(१) मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी, नमुना १८ मधील निकाल पत्रकात प्रत्येक उमेदवाराला देण्यात आलेल्या मतांची एकूण संख्या नमूद करील आणि ती घोषित करील :

परंतु, एकतर राखीव किंवा बिनराखीव जागांवरील कोणत्याही उमेदवारांना सारखी मते पडली आहेत आणि कोणताही एक उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यासाठी एका जादा मताची आवश्यकता आहे असे आढळून येईल तेव्हा, ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना असे जादा मत दिले असल्याचे मानण्यात येईल त्याची निश्चिती, निवडणूक निर्णय अधिका-याच्या उपस्थितीत आणि उपस्थित राहण्याची ज्यांची इच्छा असेल असे उमेदवार यांच्या उपस्थितीत आणि निवडणूक निर्णय अधिकारीठरवील अशा रितीने चिठ्ठ्या काढून, करण्यात येईल.

(२) असे जाहीर करण्यात आल्यानंतर, उमेदवारास किंवा त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस, अशी फेरमतमोजणीची मागणी तो का करीत आहे याची कारणे नमूद करून, अगोदर मोजणी केलेल्या सर्व किंवा कोणत्याही मतपत्रिकांची फेरमोजणी करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिका-याला योग्य वाटेल अशा अनामत रकमेसह निवडणूक निर्णय अधिका-याकडे लेखी अर्ज करता येईल.

(३) असा अर्ज करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी, त्याबाबतीत निर्णय देईल आणि त्यास, तो अर्ज संपूर्णतः किंवा अंशतः मान्य करता येईल किंवा असा अर्ज क्षुल्लक किंवा गैरवाजवी आहे असे त्यास दिसून आल्यास, तो पूर्णतः फेटाळता येईल.

(४) उप नियम (३) खालील निवडणूक निर्णय अधिका-याचा प्रत्येक निर्णय लेखी असेल आणि त्याची कारणेही त्यात नमूद केलेली असतील.

(५) निवडणूक निर्णय अधिकारी उप नियम (३) अन्वये अर्जास संपूर्णतः किंवा अंशतः मान्यता देण्याचे ठरवील तर तो,—

(अ) आपल्या निर्णयानुसार मतपत्रिकांची फेरमोजणी करील ;

(ब) अशा फेरमोजणीनंतर, नमुना-१८ मधील निकालपत्रकात आवश्यक त्या मर्यादेपर्यंत सुधारणा करील; आणि

(क) त्याने अशारीतीने केलेली सुधारणा जाहीर करील.

(६) प्रत्येक मतदाराला देण्यात आलेल्या एकूण मतांची संख्या उप नियम (१) किंवा उप नियम (५) अन्वये जाहीर करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी नमुना-१८ मधील निकालपत्र पूर्ण करून त्यावर स्वाक्षरी करील.

परंतु, मतमोजणी पूर्ण झाली असेल त्यावेळी उपस्थित असलेल्या उमेदवारांना उप नियम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करण्याची वाजवी संधी दिली जाईपर्यंत मतमोजणी पूर्ण झाल्यावर या उप-नियमान्वये कोणतीही उपाययोजना करता कामा नये.

६५. **निकाल घोषित करणे आणि समितीच्या सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे :—**

निवडणूक निर्णय अधिकारी नंतर, ज्याला सर्वात अधिक वैध मते देण्यात आली असतील असा उमेदवार निवडून आला असल्याचे घोषित करील आणि नमुना-१९ मधील निवडणुकीचे विवरण प्रमाणित करील आणि जिल्हा निवडणूक अधिकारी हा स्वतः निवडणूक निर्णय अधिकारी नसेल त्याबाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी विवरणाच्या सही केलेल्या प्रती जिल्हा निवडणूक अधिका-याकडे पाठवील. असे घोषणापत्र मिळाल्यानंतर जिल्हा निवडणूक अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाना अधीन राहून, समितीच्या सर्व निर्वाचित सदस्यांची नावे प्रसिद्ध करील आणि त्यांचे कायमचे पत्ते व ज्या मतदारसंघातून ते निवडून आले असतील त्या मतदारसंघांची नावे यासहित त्यांच्या नावांची सूची त्याच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करील आणि संबंधित बाजार समितीच्या सूचना फलकावर लावण्यासाठी आणि तिच्या अभिलेखासाठी त्या समितीच्या नोंदणीकृत पत्त्यावर त्याची एक प्रत पाठवील. जिल्हा निवडणूक अधिकारी निवडून आलेल्या समिती सदस्यांची यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे पाठवील.

६६. **एकापेक्षा जास्त जागेवर निवड होणे :—**

एखादा व्यक्ती समितीवर एकाहून अधिक जागांवर निवडून आल्यास, निवडणुकीचा निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत त्याने एक सोडून बाकी जागांचा राजीनामा स्वतः हाताने लिहून व तो राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास किंवा यथास्थिती, याबाबतीत त्यांनी प्राधिकृत केलेला असेल अशा अधिका-यास उद्देशून देईल. त्या सर्वच जागा रिक्त होतील. असा राजीनामा प्राप्त झाल्यावर किंवा अशा रीतीने रिक्त जागांकरिता, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची सल्लामसलत करून रिक्त जागा भरण्याबाबत निवडणूक घेण्याची व्यवस्था करील.

## भाग नऊ

## निवडणूक खर्च

६७. **निवडणूक खर्चाचा हिशेब :—**

(१) कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीशी संबंधित किंवा निवडणूक घेण्यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अथवा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केलेला सर्व खर्च हा, राज्य शासनाला देय असलेला खर्च असेल, व ती रक्कम अधिनियमाच्या कलम ५७ द्वारे तरतूद केल्याप्रमाणे जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे बाजार समितीकडून वसुलीयोग्य असेल.

(२) जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा यथास्थिती, निवडणूक निर्णय अधिकारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार बाजार समितीच्या निवडणूका अथवा पोट निवडणूका घेण्यासाठी आवश्यक असेल असा खर्च करील.

(३) जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा, यथास्थिती, निवडणूक निर्णय अधिकारी, पैसे प्राप्त झाल्याचे विवरण व बाजार समितीची सर्वसाधारण निवडणूक अथवा पोट निवडणूक घेण्यासाठी झालेला व त्याची प्रमाणके (व्हावचर्स) सर्वसाधारण निवडणुकीच्या किंवा पोटनिवडणुकीच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे पाठवील. जिल्हा निवडणूक अधिकारी, खर्च न केलेली शिल्लक रक्कम, कोणतीही असल्यास, बाजार समितीला परत करील.

## भाग दहा

## निवडून आलेल्या उमेदवारांची नावे प्रसिद्ध करण्याची रीत

६८. **समितीच्या सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे :—**

(१) नियम ३४ अथवा ६५ अन्वये निवडणूक निकाल मिळाल्यावर, जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडून आलेल्या समितीच्या सर्व सदस्यांची नावे दोन दिवसांच्या आत प्रसिद्ध करील आणि अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे त्यांचे कायमचे पत्ते व ज्या मतदारसंघातून ते निवडून आले असतील त्या मतदारसंघांची नावे यासह एकत्रित त्यांच्या अशा नावाची यादी त्याच्या कार्यालयातील आणि बाजार समितीतील सूचना फलकावर अथवा कोणत्याही ठळक जागी प्रदर्शीत करील.

(२) जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडून आलेल्या समितीच्या सर्व सदस्यांच्या नावाची यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, संचालक आणि संबंधित बाजार समितीला पाठवील.

६९. **उमेदवाराची अनामत रक्कम परत करणे अथवा समपहृत करणे :—**

(१) नियम २३ अन्वये ठेवलेली अनामत रक्कम, एकतर ती ठेवणा-या व्यक्तीला अथवा तिच्या प्रतिनिधी वारसाला परत करण्यात येईल अथवा निवडणूक निधीत समपहृत करण्यात येईल.

(२) या नियमात यानंतर ज्या प्रकरणांचा उल्लेख करण्यात आला आहे त्यांव्यतिरिक्त इतर बाबतीत, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर, जमेल तितक्या लवकर अनामत रक्कम परत करण्यात येईल.

(३) जर निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीत उमेदवाराचे नाव दर्शविले नसेल अथवा मतदान सुरू होण्याअगोदर त्याचे निधन झाले असेल तर, त्याची अनामत रक्कम, यादी प्रसिद्ध झाल्यानंतर किंवा यथास्थिती, त्याच्या मृत्यूनंतर, जमेल तितक्या लवकर, परत करण्यात येईल.

(४) उप नियम (३) च्या तरतुदींस अधीन राहून, मतदान घेण्यात आले असेल त्या निवडणुकीत जर उमेदवार निवडून आला नसेल व त्याला मिळालेल्या वैध मतांची संख्या, सर्व उमेदवारांना मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येच्या एक दशांशापेक्षा अधिक नसेल तर, किंवा यथास्थिती निवडणुकीत एकापेक्षा अधिक उमेदवार निवडून येतील त्याबाबतीत, मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येला, निवडावयाच्या सदस्य संख्येने भागल्यानंतर ती एक दशांशापेक्षा अधिक नसेल तर, त्याची अनामत रक्कम जप्त होईल.

## भाग अकरा

## निवडणूक विषयक कागदपत्रांचा ताबा व विल्हेवाट लावणे

७०. **निवडणुकीसंबंधीची कागदपत्रे अभिरक्षेत ठेवणे** :—

नियम ५४ मध्ये निर्दिष्ट केलेली पाकिटे व निवडणुकीसंबंधीची इतर सर्व कागदपत्रे, निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांपर्यंत किंवा निवडणुकीसंबंधीच्या विवादाच्याबाबतीत, संचालकाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने निदेश दिल्याप्रमाणे अभिरक्षेत ठेवील.

७१. **निवडणूक कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी** :—

(१) निवडणूक निर्णय अधिका-याच्या अभिरक्षेत असताना,—

(अ) न वापरलेल्या मतपत्रिकांची पाकिटे ;

(ब) वैध, दुबार नोंदलेली अथवा नाकारलेल्या अशा वापरलेल्या मतपत्रिकांची पाकिटे ;

(क) मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीची पाकिटे,

उघडण्यात येणार नाहीत आणि संचालक किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या आदेशाखेरीज, त्यातील कागदपत्रांचे कोणीही व्यक्ती अथवा प्राधिकारी, यांजकडून तपासणी करण्यात येणार नाही अथवा ती कागदपत्रे त्यांच्यापुढे सादर करण्यात येणार नाहीत.

(२) निवडणुकीशी संबंधित असलेली इतर सर्व कागदपत्रे लोकांना तपासणीसाठी खुली असतील.

७२. **निवडणूकविषयक कागदपत्रांची विल्हेवाट लावणे** :—

नियम ५४ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकिटे आणि निवडणुकीशी संबंधित इतर सर्व कागदपत्रे सहा महिन्यापर्यंत ठेवण्यात येतील व त्यानंतर ती, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा न्यायालय किंवा इतर कोणतेही सक्षम प्राधिकरण यांच्याकडून दिलेल्या कोणत्याही निदेशांना अधीन राहून, नष्ट करण्यात येतील.

## भाग बारा

## प्रासंगिक रिक्त पदे

७३. **प्रासंगिक रिक्त पदे भरावयाची रीत** :—

एखाद्या बाजार समितीच्या सदस्याचे निधन झाल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्याला अनर्ह ठरविल्यामुळे अथवा त्याला काढून टाकण्यात आल्यामुळे अथवा त्याच्या पदाची मुदत संपण्यापूर्वी अथवा अन्यथा सदस्य म्हणून काम करण्यास तो असमर्थ झाल्याने रिक्त झालेल्या पदाच्या बाबतीत, बाजार समितीचा सचिव अशा रिक्त झालेल्या जागांच्याबाबतीत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला ताबडतोब कळवील व अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे ती भरण्यात येतील.

नमुना - १
[ नियम ४ (२) पहा]

पुढील वर्षी निवडणुकीस पात्र असणाऱ्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकांच्या तपशिलासंबंधात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने ठेवावयाची कृषि उत्पन्न बाजार समितीची नावे दर्शविणारी नोंदवही

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | तालुका | बाजार समितीचे नाव व संपूर्ण पत्ता | समितीसाठी निवडून द्यावयाच्या सदस्यांची एकूण संख्या | | | पदाधिकाऱ्यांच्या मागिल निवडणुकीचा दिनांक | विद्यमान समितीची मुदत ज्या दिवशी संपते तो दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शेतकरी मतदार संघ | अडते व व्यापारी मतदार संघ | हमाल व मापाडी मतदार संघ | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

नमुना - २

[ नियम ४ (३) पहा]

**कृषि उत्पन्न बाजार समितीचा कालावधी समाप्त झाल्याचा दरवर्षी ३० नोव्हेंबर पूर्वी बाजार समितीमार्फत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास पाठवावयाच्या अहवालाचा नमुना**

| अ.क्र. | बाजार समितीचे नाव व पत्ता | विद्यमान बाजार समितीच्या पदसिद्ध सदस्यांची मुदत ज्या दिवशी संपते तो दिनांक | मतदार संघाचे नाव | प्रत्येक मतदारसंघातून निवडावयाच्या, बाजार समितीच्या सदस्यांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**टिप :- कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिव यांनी संस्थेची तात्पुरती मतदार यादी सात दिवसांच्या आत खालील बाबींचा अंतर्भाव करून देत असल्याबाबतचे प्रमाणपत्र खालीलप्रमाणे द्यावे.**

**प्रमाणपत्र**

मी, श्री/श्रीमती. ----------------------------------- सचिव, -------------------------- कृषि उत्पन्न बाजार समिती ------------------------------------ याद्वारे प्रमाणित करतो/ करते की,

१ कृषि उत्पन्न बाजार समितीची तात्पुरती मतदार यादी ही, मुदत संपण्याच्या दिनांकापूर्वी तयार करील.

२ नमुन्यामध्ये सादर केलेली माहिती खरी व कृषि उत्पन्न बाजार समितीच्या अभिलेखाशी जुळणारी आहे.

३ प्रारुप मतदार यादीमध्ये समाविष्ट करावयाचे तपशील हे या नियमातील नियम ६ नुसार असतील.

ठिकाण :-

दिनांक :- कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवाचे नाव व सही

**नमुना - ३**

**(नियम ६ (३) पहा)**

ज्या शेतक-यांनी त्यांच्या शेतमालाची ७/१२ नोंदी प्रमाणे कृषि उत्पन्न बाजार समिती मध्ये विक्री केलेली आहे त्या शेतकऱ्यांची नावे दर्शविणारा प्रत्येक बाजार समितीने निवडणूकीच्या प्रयोजनासाठी ठेवलेला नोंदवहीचा नमुना:

कृषि उत्पन्न बाजार समितीचे नांव :-

| अ.क्र. | शेतक-याचे नांव | गांव | पत्ता | शेतमाल विक्री केल्याचा दिनांक | विक्रीसाठी आणलेला एकूण शेतीमाल (क्विंटल) | दर | शेतमालाची एकूण किंमत | वसूल केलेली एकूण बाजार फी | वसूल केलेली एकूण पर्यवेक्षण फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

सचिव

सभापती

## नमुना ४
[ नियम ६ ( ६ ) पहा ]
**प्रारुप मतदार यादी**

1 कृषि उत्पन्न बाजार समितीचे नाव व पत्ता

2 मतदार संघाचे / विभागाचे ( गण ) नांव

3 प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध केल्याच्या दिनांकास एकूण पात्र मतदार संख्या :-------------

| अ.क्र. | मतदारांची यादी वर्णानुक्रमे ( आडनाव, पहिले नांव , मधले नाव ) | वय | लिंग | पत्ता |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

ठिकाण :

| बाजार समितीची मोहर |
|---|
| |

दिनांक :

बाजार समितीच्या सचिवाचे नाव व स्वाक्षरी

**नमुना - ५**
**[ नियम ७ पहा ]**
**अंतिम मतदार यादी**

1 कृषि उत्पन्न बाजार समितीचे नाव व पत्ता:

2 मतदार संघाचे / विभागाचे (गण) नाव :

3 प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्याच्या दिनांकास एकूण मतदार :---

4 अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याच्या दिनांकास एकूण पात्र मतदार :-----

| अ.क्र. | मतदाराचे नाव ( आडनाव, पहिले नाव , मधले नाव ) | वय | लिंग | पत्ता |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

ठिकाण :

बाजार समितीची मोहर

दिनांक :

जिल्हा निवडणूक अधिका-याचे नाव व स्वाक्षरी

नमुना - ६
[ नियम १९ ( एक) पहा ]

निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय,---------------------------------------
( सद्याचे कार्यालयीन पदनाम नमूद करावे )
कृषि उत्पन्न बाजार समितीचे नाव -------------------------------- तालुका ----------------------- जिल्हा -----------------------

नियम १९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीकरिता मी,------------------------------------------- (कार्यालयीन पदनाम) आणि जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी अथवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या पूर्वमान्यतेने ------------------------------------------------- कृषि उत्पन्न बाजार समिती ----------------, तालुका --------------, जिल्हा -------------- यांच्या समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्याकरिता नियुक्त केलेला, निवडणूक निर्णय अधिकारी, याद्वारे,-----------------------कृषि उत्पन्न बाजार समिती , --------- तालुका--------- जिल्हा--------- म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाजार समितीच्या सदस्याची / सदस्यांची निवड करण्याच्या निवडणुकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करीत व जाहीर करीत आहे आणि यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ- (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदारसंघाच्या किंवा मतदारसंघांच्या (यात यानंतर ज्याचा निर्देश संबंधित मतदारसंघ असा करण्यात आला आहे.) संबंधातील निवडणुका घेण्याचे नियत करीत आहे.

अनुसूची

| अ.क्र. | मतदार संघाचे नाव | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यासाठीचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा ) | नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिद्ध करणे | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक व वेळ | वैध नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिद्ध करण्याचा दिनांक | उमदेवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन करण्याचा दिनांक | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणी चा दिनाकं , वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनाकं |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता :-- --------------------------

संपर्क क्र.:-- --------------------------------
इ- मेल :- ------------------------------------------

निवडणूक निर्णय अधिका-याचे नाव , स्वाक्षरी व मोहर
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण/ जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मान्यतेने

नमुना क्रमांक ७

{नियम २० (२) पहा }

**नामनिर्देशनपत्राचा नमुना**

कृषि उत्पन्न बाजार समिती-----------तालुका ------------जिल्हा ----------ची सन ----- ते -------
या कालावधीसाठीची निवडणूक) (सूचकाने भरावयाचे)

मी,-----------------------------------------------------याद्वारे श्री./श्रीमती-------------------------------------
यांना.........................या मतदारसंघातील / विभागातील (गण) उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहे.

१. मतदारसंघाचे / विभागाचे (गण) नाव :- ...............................................

२. उमेदवाराचे नाव :-

आडनांव नाव वडीलांचे /पतीचे नांव

३. उमेदवाराचे वय :- ---------------------

४. उमेदवाराचा टपालाचा संपूर्ण पत्ता :-

(निवासी पत्त्याबाबतचा पुरावा व ओळखपत्राची छायांकित प्रत जोडावी)

५. संपर्क क्रमांक (अ) निवास / कार्यालय -

(ब) भ्रमणध्वनी क्र.. --

(क) ई- मेल आय डी ---

(ड) आधार कार्ड क्र. ----

६. मतदारसंघाचे / विभागाचे (गण) नाव -

(एक) राखीव जागा असलेल्या मतदारसंघात उमेदवार ज्या अनुसूचित जातीचा किंवा अनुसूचित जमातीचा किंवा इतर मागास प्रवर्गाचा किंवा भटक्या जाती किंवा विमुक्त जमातीचा किंवा विशेष मागास प्रवर्गाचा असेल त्याचा तपशील नमूद करावा.

(दोन) ज्या मतदारसंघात उमेदवाराचे नाव नोंदलेले आहे त्या मतदारसंघाचे नाव (लागू असल्यास नमूद करावे)

(तीन) ज्यात उमेदवाराचे नाव मतदार म्हणून नोंदलेले असेल त्या पूर्वोल्लेखित मतदारसंघाच्या मतदारांच्या यादीतील उमेदवाराचा अनुक्रमांक:-

७. सूचकाचे नाव:-

(आडनाव) (नाव) (वडिलांचे /पतीचे नाव)

८. संपर्क क्रमांक (अ) निवास / कार्यालय ..........................
(ब) भ्रमणध्वनी क्र.. ......................
(क) ई- मेल आय डी ........................

९. मतदारसंघाच्या मतदार यादीतील सूचकाचा अनुक्रमांक:- ..........................

सूचकाची स्वाक्षरी

१०. अनुमोदकाचे नाव

(आडनाव) (नाव) (वडिलांचे /पतीचे नाव)

११. मतदारसंघाच्या मतदार यादीतील अनुमोदकाचा अनुक्रमांक:- ...............................................

तारीख अनुमोदकाची स्वाक्षरी

मी याद्वारे सूचित करीतो की, निवडून आल्यास बाजार समितीचा संचालक म्हणून मी काम करण्यास तयार आहे.

उमेदवाराची सही

उमेदवार जेव्हा अनुसूचित जाती किंवा जमाती, निरधिसूचित जमाती ( विमुक्त जाती ) , भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग चा असतो तेव्हा द्यावयाचे घोषणापत्र

मी याद्वारे जाहिर करतो की, मी अनुसूचित जातीची / जमातीचा, निरधिसूचित जमाती ( विमुक्त जाती ) , भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग आहे. ही जात / जमात, निरधिसूचित जमाती ( विमुक्त जाती ) , भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जात / जमात आहे.

तारीख

उमेदवाराची सही

निशाणीच्या ( चिन्हाच्या ) निवडणुकीसंबंधी प्रतिज्ञापन

मी याद्वारे जाहिर करतो की, माझ्या निवडणुकीसाठील ज्या निशाण्यांची निवड केली आहे त्या निशाण्या ( चिन्हे) , माझ्या अग्रतेनुसार पुढे दर्शविण्यांत आल्या आहे.

१ २ ३

तारीख

उमेदवाराची सही

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक

हे नामनिर्देशनपत्र मला माझ्या कार्यालयात तारीख रोजी वाजता उमेदवार / उमदेवाराचा सूचक यांचेकडून देण्यांत आले .

तारीख निवडणूक निर्णय अधिका-याची सही

निवडणूक निर्णय अधिका-याचा नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचा किंवा नाकारण्यासंबंधी विषय

मी हे नामनिर्देशनपत्र कृषि उत्पन्न नियम १९६७ च्या नियम २५ नुसार तपासले असून पुढील प्रमाणे निर्णय देत आहे.

( येथे निर्णय दयावा )

तारीख निवडणूक निर्णय अधिका-याची सही

नामनिर्देशनपत्र मिळाल्यासंबंधी पावती व छाननीच्या तारखेची नोटीस

ज्या व्यक्तीने नामनिद्रेशनपत्र दिले तयाला द्यावयाचे

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक श्री. यांचे नामनिर्देशनपत्र बाजार समितीच्या मतदार संघातून उमेदवार म्हणून उभे राहण्यासंबंधीचे नामनिर्देशनपत्र माझ्या

उमेदवाराने / उमेदवाराचे सुचकाने दिले

सर्व नामनिर्देशनपत्र छाननीसाठी तारीख रोजी वाजता घेण्यांत येतील

ठिकाण

तारीख

निवडणूक निर्णय अधिका-याची सही

# नमुना ८

(नियम २९ (१) पहा )

## निवडणूक लढविणा-या उमेदवारांची अंतिम यादी

कृषि उत्पन्न बाजार समिती-----------तालुका ------------जिल्हा ----------यांच्या समिती सदस्यांची ----------------मतदार संघातील / विभागातील (गण) निवडणूक

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा पत्ता | उमेदवाराला नेमून दिलेली निशाणी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |
| | | | |
| | | | |

ठिकाण :-

दिनांक :-

........................................

निवडणूक निर्णय अधिका-याची स्वाक्षरी

टीप :- निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नावे त्यांच्या आडनावाच्या इंग्रजी वर्णमालेप्रमाणे लिहावीत. आडनाव नसल्यास त्यांच्या पहिल्या नावाप्रमाणे यादी तयार करण्यात यावी. निवडणूक निर्णय अधिका-याच्या कार्यालयाच्या व बाजार समितीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या सूचना फलकावर सदर यादी प्रसिध्द करण्यात यावी.

**नमुना ९**

**(नियम ३१ (१) पहा )**

**निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक**

कृषि उत्पन्न बाजार समिती-----------तालुका ------------जिल्हा ----------यांची मतदार संघातील / विभागातील (गण) समितीची निवडणूक

प्रति,

निवडणूक निर्णय अधिकारी

.........................................

मी,................................वरील निवडणुकीतील उमेदवार, याद्वारे अशी नोटीस देतो की, मी........................... ................(मतदार यादीतील अनुक्रमांक.........) याची उक्त निवडणुकीत माझा निवडणूक प्रतिनिधी म्हणून आजपासून नेमणूक करीत आहे

ठिकाण : ---------

दिनाकं : ------------

उमेदवाराची स्वाक्षरी

मी वरील नेमणूक स्वीकारीत आहे.

ठिकाण : -------------

दिनाकं : -------------

...............................

निवडणूक प्रतिनिधीची स्वाक्षरी

नमूना १०

( नियम ३२ (१) पहा )

**मतदान प्रतिनिधींची/मतमोजणी प्रतिनिधींची नेमणूक**

................ कृषि उत्पन्न बाजार समिती ---------------- तालुका ----------------जिल्हा ------------ यांची ------------------ मतदारसंघातील / विभागातील (गण) समिती सदस्यांची निवडणूक

प्रति,

निवडणूक निर्णय अधिकारी / मतदान केंद्राध्यक्ष,..................

मी,......................................विद्यमान निवडणुकीतील उमदेवार, याद्वारे ,विनंती करतो की, मी श्री/श्रीमती .......................................... यांना मतदान प्रतिनिधी म्हणून मतदान केंद्रावर मतदान केंद्र/मतदान मंडप क्रमांक--------------येथे उपस्थित राहण्यासाठी नियुक्त करीत आहे.

..................

उमेदवाराची स्वाक्षरी

दिनाकं :

मी मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्यास संमती देतो/देते.

..................

मतदान प्रतिनिधीची स्वाक्षरी

दिनाकं

**निवडणूक निर्णय अधिकारी / मतदान अधिकारी यांच्यासमोर सही करून मतदान / मतमोजणी प्रतिनिधीने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.**

मी, याद्वारे घोषित करतो की, मी, ................................ (मतदार संघाचे नाव) मतदारसंघातील निवडणुकीच्या वेळी, अधिनियम किंवा त्याखालील नियम किंवा उपविधी अन्वये निषिद्ध असलेले कोणतेही कृत्य करणार नाही.

दिनांक :

मतदान प्रतिनिधीची /मतमोजणी प्रतिनिधीची स्वाक्षरी

दिनांक :

माझ्यासमोर सही केली.

निवडणूक निर्णय अधिकारी/मतदान अधिकारी.

नियम ११

( नियम ३४ पहा )

## बिनविरोध निवडणुकीच्या निकालाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना

........................कृषि उत्पन्न बाजार समिती ----------------, तालुका -------------------, जिल्हा----------------- यांची ---------------------मतदारसंघातील / विभागातील (गण) ---------------------------- (वर्षे) कालावधीसाठी निवडणूक

निवडणुकीचे वर्ष

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ च्या नियम ३० मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींना अनुसरून, मी घोषित करतो की, श्री./श्रीमती .............................. वरील मतदारसंघातील / विभागातील (गण) एक जागा/अनेक जागा भरण्यासाठी त्या मतदारसंघात तो एकटाच / ते एकटेच बिनविरोध उमेदवार असल्याने यथोचितरीत्या निवडून आला आहे / निवडून आले आहेत .

मी असे देखील प्रमाणित व घोषित करतो की, व्यवस्थापन समिती स्थापन करण्यासाठी निवडून द्यावयाच्या जागांवर वर नमूद केलेले उमेदवार यथोचितरीत्या निवडून आलेले आहेत.

ठिकाण:

दिनाकं:

......................................

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

नमूना १२

( नियम ३८ पहा )

मतपत्रिकेचा नमुना

................कृषि उत्पन्न बाजार समिती --------------------तालुका. ................., जिल्हा.................,
यांची ................. मतदारसंघातील / विभागातील (गण) निवडणूक.

निवडणुकीचे वर्ष : ................. अनुक्रमांक : .................

..........................कृषि उत्पन्न बाजार समिती ----------------ता. -------------------- जिल्हा------------
--------- यांची ---------------------- मतदारसंघातील / विभागातील (गण) निवडणूक .

निवडणुकीचे वर्ष ----------------------

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नेमून दिलेली निशाणी |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## नमुना - १३

(नियम ४४ (२) (क) पहा)

### आक्षेपित मतांची यादी

..........................कृषि उत्पन्न बाजार समिती ----------------तालुका -------------------- जिल्हा--------------------- यांची ----------------------- मतदार संघातील / विभागातील (गण) निवडणूक .

(अ ) मतदार संघाचे / विभागाचे (गण) नाव

(ब) मतदान केंद्र ( ठिकाण )

(क) मतदान केंद्राचा क्रमांक (कोणताही असल्यास )

| नोंदीचा अनुक्रमांक | मतदाराचे नाव | मतदार यादीनुसार मतदाराचा अनुक्रमांक | मतदाराची सही किंवा अंगठयाची निशाणी व त्याचा पत्ता | आक्षेप घेणा-या व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |

| दिलेली अनामत रक्कम ( रु.) | दिलेला ओळखीबाबतचा पुरावा | प्रत्येक प्रकरणातील मतदान केंद्राध्यक्षाचा आदेश | अनामत रक्कम परत करण्यात येईल तेव्हा ती मिळाल्याबद्दल आक्षेप घेणाऱ्याची सही | अनामत रक्कम परत न दिल्यास मतदान केंद्राध्यक्षाचे शेरे |
|---|---|---|---|---|
| ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | |
| | | | | |

ठिकाण:

दिनांक:

मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी

नमुना - १४

( नियम ४८ (१) पहा )

## अंध किंवा अपंग मतदाराच्या सोबत्याने करावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना

.........................कृषि उत्पन्न बाजार समिती ----------------, तालुका --------------------,
जिल्हा--------------------- यांची ----------------------- मतदार संघातील / विभागातील (गण)
समिती सदस्यांची निवडणूक .

मतदार केंद्राचा क्रमांक व नाव

मी, -----------------------------------------, वय --------------------------------------
राहणार----------------------------------------------------- याद्वारे घोषित करतो की :

(अ) मी जो वरील निवडणुकीतील अंध/ अपंग मतदार आहे व ज्याचे नाव असून मतदार यादीतील अनुक्रमांक ----------------वर आहे त्या श्री/ श्रीमती ---------------------------------
-------------------------------------- यांचा सोबती म्हणून काम करु इच्छितो;

(ब) मी आजच्या दिवशी यापूर्वी कोणत्याही मतदान केंद्रावर इतर कोणत्याही मतदाराचा सोबती म्हणून काम केलेले नाही;

(क) उपरोक्त मतदाराच्या वतीने मी नोंदलेले मत गुप्त ठेवीन.

ठिकाण:

दिनांक :

सोबत्याची स्वाक्षरी

नमुना - १५

( नियम ४८ (२) पहा )

अंध आणि अपंग मतदारांची यादी

..............................कृषि उत्पन्न बाजार समिती ------------------------------, तालुका ---------
---------- , जिल्हा--------------------- यांची ............... मतदारसंघातील / विभागातील (गण) व्यवस्थापन समिती सदस्यांची निवडणूक.

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव :- -----------------

| मतदाराचा अनुक्रमांक | मतदाराचे संपूर्ण नाव | सोबत्याचे संपूर्ण नाव | सोबत्याचा पत्ता | सोबत्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

ठिकाण :

दिनाकं:

मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी.

नमूना - १६
( नियम ५० (२) पहा )

**प्रदत्त मतदारांची यादी**

..................कृषि उत्पन्न बाजार समिती ...................................., तालुका....................... , जिल्हा.....................
यांची निवडणूक.

(अ) मतदारसंघाचे / विभागाचे (गण) नाव ............................
(ब) मतदान कें द्र (ठिकाण) ..........................
(क) मतदान केंद्राचा क्रमांक कोणताही असल्यास ........................

| नोंदीचा अनुक्रमांक | मतदाराचे नाव | मतदार यादीतील मतदाराचा अनक्रमांक | मतदाराचा पत्ता | प्रदत्त मतपत्रिकेचा अनुक्रमांक | ज्या व्यक्तीने पूर्वीच मतदान केले असेल त्याला देण्यात आलेल्या मतपत्रिकेचा अनक्रमांक | मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

ठिकाण:

दिनांक:

.....................

मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी

नमुना - १७

( नियम ५३ (१) पहा )

**मतपत्रिकांचा हिशेब**

...................कृषि उत्पन्न बाजार समिती ..................................., तालुका.................. ,
जिल्हा...................... यांची मतदार संघातील / विभागातील (गण) निवडणूक.
................ मतदार संघ / विभाग (गण)

| अ.क्र. | मतदान केंद्राचे नाव | अनुक्रमांक | एकूण संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| एक. | मतदान केंद्राध्यक्षास मतदान केंद्रावर आणि जर मतदान केंद्र एकापेक्षा अधिक मंडपात असल्यास प्रत्येक मंडपावर मिळालेल्या मतपत्रिकांची संख्या. | | |
| दोन | मतदारांना दिलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| तीन. | परत केलेल्या वापरात न आणलेल्या मतपत्रिकांची संख्या. | | |
| चार. | रद्द केलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| पाच. | प्रदत्त मतदानासाठी वापरलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |

ठिकाण :

दिनाकं:

......................
मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी

टीप :- मतदान केंद्रावर एकापेक्षा अधिक मतदान मंडप असल्यास अशा प्रत्येक मतदान मंडपाच्या बाबतीत या नमुन्यामध्ये वेगळा हिशेब ठेवण्यात येईल.

नमुना - १८
[नियम ६४ (१) पहा]
निकालपत्राचा नमुना

..................कृषि उत्पन्न बाजार समिती ...................................., तालुका........................ , जिल्हा....................... मतदारसंघातील / विभागातील (गण) निवडणूक.

| मतदान केंद्र | | अ,ब,क,ड इत्यादींना मिळालेली एकूण वैध मते | | | | एकूण वैध मते | फेटाळण्यात आलेली मते | संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | मतदान केंद्रांचे नांव | अ | ब | क | ड | | | मतदान केंद्रावरील एकूण मते | प्रदत्त मते |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| ......................या मतदान केंद्रावर ( मतदान केंद्रावर ) नोंदविलेल्या मतांची एकूण संख्या : | | | | | | | | | |

ठिकाण:

दिनांक:

............................
निवडणूक निर्णय अधिका-याची स्वाक्षरी

नमुना - १९

[ नियम ६५ पहा ]

## निवडणूक निकालाचा आणि समितीच्या सदस्यांची नावे घोषित करण्याचा नमुना

..................कृषि उत्पन्न बाजार समिती ...................................., तालुका........................ ,

जिल्हा.......................

(एक) ........................ (कालावधीसाठी) निवडणूक

(दोन) मतदारसंघाचे / विभागाचे (गण) नाव :- ...............................

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवारांना मिळालेली एकूण वैध मते |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |

(अ) एकूण वैध मते -

(ब) एकूण अवैध मते -

(क) एकूण प्रदत्त मते -

मी घोषित करतो की, (नाव) ........................................................................... (पत्ता) ........................................ हे यथोचितरीत्या निवडून आलेले आहेत.

मोहर

...............................

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विजय कुमार,

शासनाचे प्रधान सचिव.